स्वरांल
5070 लोहिया झोला
म 8235
Women Study ... Ambajogai

# स्वरांत

**शैला लोहिया**

Swami Ramanand
Granthalaya

१००३

5070

U.G.C.S.G.
LIBRARY
S.R.T.M., AMBAJOGAI.

स्वरांत / प्रथमावृत्ती १९८१

© शैला लोहिया

प्रकाशक /

**बाबा भांड**
अक्षर प्रकाशन,
बन्सीलालनगर, औरंगाबाद

मुखपृष्ठ / वैजनाथ दुलंगे

मुद्रक /

**ज. रा. बर्दापूरकर**
जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद

---

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखन उत्तेजन योजनेखालील अनुदानाने प्रकाशित

जीवनातला प्रत्येक सूर जपायला शिकविले त्या

**आई नि पपांना**

( सौ. शकुंतला व शंकरराव परांजपे, धुळे )

**- शैला**

# मनोगत

.........इतकंच !

खूप खूप दिवसांपूर्वीची गोष्ट. मी छोटी होते तेव्हाची. दरवर्षी उन्हाळयात नाहीतर दिवाळीच्या सुटीत आम्ही पार्ल्याला जात असू. मामाकडे. चांदवडचा चढ असो, नाहीतर कसाऱ्याचा हिरव्यागर्द झाडांनी वेढलेला वळणदार घाट असो. माझे डोळे खिडकीच्या बाहेर गढलेले असत. मला वाटे, हे आकाश . , हे दगड..., हा डोंगर... हे झाडं ही पिवळी फुलं... मला पुन्हा कधीच भेटणार नाहीत. मनांत आंत कुठे तरी व्याकुळतेची लहर दाटून येई. डोळे अधाशासारखे सारं गिळून घ्यायला धडपडत. मग दारची सारी म्हणत, 'खुळं आहे' झालं. या खुळेपणाचं कौतुक केलं माझ्या मामांनी. वक्तृत्वस्पर्धेत मिळालेलं बक्षिस असो; नाहीतर महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रकाशित झालेला चिमुकला लेख असो. किंवा थरथरत्या आवाजात गायलेली एखादी कविता असो. कौतुकाचा हळुवार शिडकावा केला मामांनी नाहीतर आईंनी. त्यामुळेच खुळेपणाला शब्दांचे कोंभ फुटले. पार्ल्याच्या बंगल्यात रहाणाऱ्या गानूंची मी भाची नसते तर, जीवनाचा ओघ दहादिशांनी अंगभर झेलावा; त्याचे गार...उष्ण...कडवट स्पर्श अंतरात गोंदवून घ्यावेत, हे कळले असते की नाही कुणास ठाऊक !

"तू मुलगी आहेस. म्हणून हे करू नकोस. इथे जाऊ नकोस." असा संस्कार आई-पपांनी दिलाच नाही. पण केलेल्या कृतीच उत्तर-दायित्व स्वीकारावच लागतं याची कठोर जाणीवही दिली. आम्ही विवाह करायचं ठरवलं. तर, डॉक्टरना पहायची उत्सुकता पपांनी दाखविली नाही. लग्नाच्या दिवशीच सासरे-जावयाची गाठ पडली. त्यांच्या मित्रांनी आदल्या दिवशी विचारलं होतं.

'शंकरराव, तुम्ही अजून जावयाला पाहिलं नाही. मुलगी आंतर-जातीय लग्न करतेय. पुढे काही बखेडा झाला तर ?...'

पपांनी नेहमीप्रमाणे ओठात हंसत उत्तर दिलं–

" तिला शिक्षण दिलंय. तिने विशी ओलांडलीय. जीवनाबाबत बरं वाईट तिला कळायला हवं. पुढे काही अडचणी निर्माण झाल्या तर, त्याचे उत्तरदायित्व तिच्यावर आहे. त्या अडचणी तिने निभवायला हव्यात. आम्ही आहोतच. पण असं काही घडणार नाही असा मला विश्वास आहे."

आई-पपांनी दिलेला हा विश्वासाचा सूर पुढे डॉक्टरांनी पण जपला. माझ्या वेडयावाकुडया शब्दांचे पहिले वाचक तेच राहिले आहेत. त्यांची तक्रार असते की मी खूप कमी लिहिते. पण लिहू म्हटल्याने का कुठे लिहिता येते ? आणि लिहायचं नाही म्हटल्याने का कुठे स्वत:ला रोकता येते ?

गेल्या ८/९ वर्षात लिहिलेल्या, पहिल्यावहिल्या नऊ कथांचा संग्रह आज इंद्रायणीत अर्पण करतेय. (या कथा स्त्री, माहेर, मेनका, मराठवाडा यातून प्रकाशित झाल्या आहेत.) या कथासंग्रहात तरण्याचे सामर्थ्य असेल तर तो तरेल. अन्यथा बुडून जाईल. नव्हे, त्याने बुडायलाच हवे. [illegible] खऱ्या कळा असतील तरच डवलासा कोवळा जीव जन्माला येतो. खोटया कळा खोटयाच असतात. उदरात लपलेल्या जीवाला मोकळा श्वास देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसते. अळेबळे जन्माला घातलेला अनुभव अल्पायुषीच ठरणार.

तरीही मी समाधान मानीन. कारण या फसव्या कळांतूनच, खऱ्या; जन्मोत्सवी कळांच्या लाटा जन्माला येतात. ते सामर्थ्यही कधीनाकधी लाभेल ! ! !

संसार, नोकरी, बाकीच्या उठाठेवी यात बुडालेल्या या भाबीच्या कथा एरवी इकडेतिकडेच लोळल्या असत्या. जर महावीर जोंधळेसारखा दीर लाभला नसता तर ! कथा, मागेलागून नेण्यापासून ते त्यांना देखणं रूप देईपर्यन्तचे सारे संस्कार त्यानेच केले आहेत. साथ मिळाली श्री. बाबा भांड यांची. प्रकाशनार्थ अनुदान मिळविण्यासाठी करावी लागणारी धडपडही या दोघांनीच केली. त्यांच्या सहयोगामुळेच 'स्वरान्त' ला रूप लाभले आहे. पण आभार कशी मानू ? सारीच आपली.

'स्वरान्त' च्या निमित्तानं जे जे मनात आलं, त्याला मोकळी वाट करून देतेय. इतकंच.

– शैला लोहिया

कथा


१) स्वगत / ९

२) शेष प्रश्न / १७

३) एका गांधारीच्या डायरीतली काही पाने / २७

४) सांगण्यासारखं काहीच उरलं नाही / ३८

५) वाढत्या सांजवेळे / ४७

६) पहाट नाते / ५९

७) तुझीयामाझ्यामध्ये पहाट झाली सेतू / ७०

८) मृत्यूव पथे / ८३

# स्वरांत

पावलावर लोळणारा हिरवाजर्द निऱ्यांचा घोळ, तो अलगद वर उचलून ती आत आली. तिची गव्हाळ पावलं. मधल्या बोटात एकेक चंदेरी वेढं. टक् ... टक् ... वाजणारं. शिवाय घुंगरांचा चिमणा चाळा. ती पाटावर बसली. तिला धड बसताही येईना. कसंही बसा, पोट मध्येच यायला लागलं. मोगरीची कळी ऐन संध्याकाळी फुलायला यावी, तसं पोट ! मग सगळ्या बायका खुद्खुद्ल्या. आठवणींनी खुळखुळल्या क्षणभर. ती खूप लाजली. गालाला खळी पाडत.

तिचं हसणं, तिचं पानसळी रूप मी पाहतेय. पाहता पाहता हरवून जातेय.

मग मीच तिच्या रक्तातून वाहू लागते.

मग मीच लाजते.

गोऱ्यापान पारिजातकाची फुलं विखरून पडतात, ती माझ्याच झाडाची असतात.

* * *

चहा बशीत सांडतोय्.

तो बहुधा सगळ्यांच्याच हातून आणि प्रत्येक वेळीच सांडत असावा. मग एक रागीट नजर. बहुधा बापाची किंवा कर्त्या भावाची.

एकूण चहापोहे बरे आहेत. या दिवसातही खोबरं नि शेंगादाणे घातले आहेत.

'पोरगी निबर वाटते नाही ?'

'नाकही पसरट आहे.'

'रंगही बेताचाच. तकाकी नाही.'

'च्यायला अंगानं तरी गच्च असावी की ! नोकरीचे पाचशे पंचाहत्तर रुपये एवढीच जमेची बाजू.'

* * *

उषानं आजही रजा दिलीय.

'आजारी आहे ?'

'इश्श्य ! इंदे, तू तरी फालतू इनोसन्सचा आव आणतेस. लग्न झाल्यावर कोणता आजार होणार ग ?'

'आता तर झालंय लग्न. महिना झाला असेल.'

'लग्नात न्हायली होती. नि लगेच गुटुरगुम्. नि मग नवव्या महिन्यात पोर–'

'खरंऽऽच्च ? इश्श्यऽऽ !'

दोन वांझ कळा. ओटीपोटाकडे धावणाऱ्या.

'आपले डोळे मिटायच्या आत पोर उजवायला हवी !

'तुम्ही रात्रीच्या बाहेर गप्पा मारीत बसता. सैपाकघरात अरुण नि सूनबाई. पोर मध्ये एकटीच. आता जा कशा–'

'बिजवर का होईना, बघायला हवा...आताशा पाय नि कंबर फार धरते.'

* * *

'भूक लागलीय.'

'इतक्या रात्री? चला.'

'हूं.'

'पोहे देऊ लावून? की भाकरी टाकू ?'

'अहं,'

'मग?'

'..................'

गोऱ्या पोटरीवरून वर सरकणारी पावलं.

'हे काय?'

'तू हवीस. अगदी पूर्ण–'

'शूऽऽ. बाहेर वन्सं आहेत.'

'माहितेय. मुक्यानी आटोपलेले व्यवहार नकोत आता. तुझं कातीव रूप. मिटलेल्या डोळ्यांतून सळसळणारी गोड वेदना. दुखऱ्या ओठांतून झिरपणारे सीत्कार. सारं उजेडात निरखायचंय मला.'

खूप भूक लागलीय.

* * *

घोषा.

रानावनात भटकणारी. वैराण मन. वर पांढरं आभाळ. पांढरे ढग वांझ असतात.

...तर घोषा रानात उगाचच भटकतेय. अंगभर उतलेलं पांढरं कोड वागवीत नुस्तं भटकायचं.

तर, तिला एकदा दोन पानं सापडली. कोवळी नी रसरशीत. इतकी ताजी की सहज तोंडात टाकावीत. घोषानं तेच

केलंन्. दाताखाली पान रगडलं असेल नसेल तोच अश्विनी-कुमार दत्त म्हणून उभे!

अश्विनीकुमार... त्यांच्या नाकाला सोमरसाचा घमघमाट सोसवेनासा झालेला. तोंडाला पाणी सुटलेलं.

घोषा सावध. ओठ गच्च मिटून.

'देवी, सोमरसासाठी धावत आलोय. ती सोमवल्ली आम्हाला देशील?'

'....................'

'देवांचे वैद्य अश्विनीकुमार म्हणतात आम्हांला. त्या सोमरसाच्या केवळ 'गंधानं रक्त उत्तेजित झालं आमचं. देवी, ती पानं. तो रस...'

'पानं मिळतील पण...'

'काय पाहिजे ते माग.'

'सुंदर रूप हवंय मला... सुंदर रूप इंद्राणीहून सरस असं...'

...मग पुन्हा घोषा...

विवाहाच्या वेदीभोवती फेरे घालणारी. आनंदनिर्भरा.

* * *

साडे – सहा वाजून गेलेले. ऑफिस भणाण रिकामं. फक्त बॉस थांबलाय. टाईप केलेले कागद हातात घेताना त्याची नजर बोचते.

'उशीर झाला आज?'

'हं.'

'थेट घरीच का आता?'

'होय.'

'सम् टाइम्स यू मस्ट बी फिलिंग लोनली. इजंट इट ?'

'... ... ...'

'आय वुड लाइक टू गिव यू कंपनी. ... ... अर्थात अधूनमधून'

मग ही ... ही ... ही ...

बिच्चारी बायको. गोरीभुरकी. कुरळ्या केसांचे फुलोर चाचपीत चालणारी. बिनबाह्यांचं पोलकं नि लिपस्टिकवाली:

'यू मस्ट बी नीअर थर्टी. बट यू हॅव मेंटेंड युवर फॉर्म. एक पोर झालं की बायका एकतर बरण्यातरी होतात नाहीतर धुणं वाळत घालायच्या काठ्या तरी !'

'... ... ...'

* * *

स्वप्नात मी घोषाच असते.

पण अश्विनीकुमार येतच नाहीत.

किती वाट पाहायची ? ... किती म्हणून वाट पहायची ?

'अफालीचं रक्तदोषान्तक घ्या आणि लॅक्टोकॅलमिनमध्ये प्लॅसेन्ट्रेक्सच्या दोन ॲम्पुलस् फोडून मिसळा. रोज तीन वेळा ॲप्लाय करा. शिवाय तीन वेळा कोमट पाण्यानं तोंड धुवायचं. तोंडावरचा मुरूम गेलाच पाहिजे. बट, युवर अेज ?'

'थर्टी—टू.'

इंग्लिशमध्ये वय सांगितलं की जरा कमी भासतं.

'ओह ! बत्तीस ?-पण करा उपाय'

अदरवाओज, विशीतल्या मुलींना हमखास गुण येतो. सो. ... ?' तर मग अश्विनीकुमारांची किती वाट पहायची ?

कदाचित भेटतीलही....

मग मीही होईन घोषा. भांगातून सिंदूर रेखलेली आनंदनिर्भरा.

*  *  *

उषाचं पोर खूप छान आहे. गुलाबी गुलाबी. एस्. टी. तून घाट उतरताना एक पिंपळाचं कोवळं झाड पाहिलं होतं.

गुलाबी पानांनी झुळझुळणारं. कोवळं नि तकतकीत. हलू की नको, हलू की नको. असं हालणारं !

बाळ दूध पितंय चुरूचुरू.

' स्सस्स ह्राय ! किती जोरात ओढतो, गाढव ! '

तिच्या गालावरून हलका गुलाबी रंग सांडतो.

कितीतरी आठवणी.

ह्याच्या नि त्याच्या.

त्याच्या नि ह्याच्या.

*  *  *

इंदीला आज फोन आला होता. फोन आला की इंदी लवकर पळते आणि जरा तंद्रीतही असते.

' इंदे, आज फोन आलाय. मग घाई असेल. '

' चल चहाटळ ! '

' मारलास कुठं पाचर ? '

' तिशी ओलांडलीय बये मी ! पाचर ठोकायला धार लागते. तो वर्मा नाही का ग येत माझ्याकडे अधूनमधून ? '

' ते ठोक्यांचं भांडं ? काळा गॉगल ? '

' हं. त्याचा बिझिनेस आहे. डान्सिग स्कूलसारखा. पण घरगुती हं. तो फोन करतो कधीतरी. '

डोकं खूप जड पडलं ना ? की अगदी हल्लकं होऊन जातं एका क्षणात.

*  *  *

ते कोवळं बाळ सारखं दिसतं. मला का नको बाळ ? हलत्या पाखरांसारखे त्याचे गुबरे गाल. गुलाबाच्या पाकळी-सारखे तळवे. जवळ घेताना किती छान वाटत असेल !

(मला बाळ) का नको ?

मला हवंय.

मी कुरूप. काळी.

म्हणून लग्न नाही.

आणि म्हणून बाळ पण नाही.

का ?

असं का ?

माझा रंग नको असेल कुणाला. पण माझ्या बाळाभोवती कुंपण का ?

कुंपण का ?

* * *

सिंडरेलाला त्या राजपुत्रानं हाकलून दिलं म्हणे ! मग सिंडरेला पुन्हा शिळीपाकी झाली. कळकट, तेलकट, झिपऱ्यांचं टोपलं.

अशी कुठं राणी असते ?

मग राजपुत्र म्हणाला,

'ए भिकारडे ! निकल जाव यहाँसे. अभी के अभी.'

* * *

उषाचं बाळ घरभर रांगतं. मातीचे पोपडे उकरून खातं. दात येताहेत त्याला. काल खूपदा शी पण केली. उषा नर्व्हस आहे आज. त्याला कॅलशियम द्यायला हवं. कॅलशियम डेफिशियन्सी असली की मुलं माती खातात. केळं खायला

द्यायला हवं. शिवाय मोसुंब्याचा रस. टोमॅटोचं पाणी. मग कसं गुब्बु ... गुब्बु होओील. मर्फीच्या वाळासारखं !

* * *

बॉस बरा की वर्मा ?

बॉस गोरागोमटा आहे. मग बाळही केवड्याच्या पानासारखं होईल. पण माझा रंग घेतला तर ?

कसं का असेना ! ते हिरवळीसारखं लुसलुशीत नक्कीच असेल.

* * *

' आटोपलं का ? '

त्रासिक स्वर.

' आयला, उगाच रडण्याची ढोंगं. मेली नि अब्रू सवालाखाची राहिली. '

' चार महिने झाले होते, म्हणे ! '

' अहो, थांबा जरा. बाहेर आणतील तेव्हा बांधताना नीट पाहून घ्या. हो, खऱ्याखोटयाचा समक्ष पडताळा. '

' कोण होता ? '

' होता ? ...... अहो, होते म्हणाना ! नेमकं कुणाचं म्हणून सांगावं ? सुटला भाऊ. '

' या वाढत्या पोरी म्हणजे न विझणाऱ्या दिवटया. कधी नि कुठं आगी लावत सुटतील नेम नाही. '

' कुणास ठाउक ! तिनंच विष घेतलंन की भावानं दिलंन. हल्ली काही कुणाचा भरोसा देऊ नये. इंदी म्हणत होती की तिला मूल वाढवायचं होतं '

' इश्श्य ऽऽ काहीतरीच ! ! '

* *

# शेष प्रश्न

ऊर्मिलेला माहित आहे तू माझ्यासाठी इथे येतोस ते ?

... ... ... ...

मी हा प्रश्न विचारायला नको होता का ?

गेली आठ वर्षं मी न चुकता इथे येतो.

तूही येतेस...

पहिल्यांदा वाटलं. तू येणार नाहीस.

पण तू आलीस.

मनाला धास्ती होती की तू हा प्रश्न विचारशील. पण तोही तू विचारला नाहीस.

तू माझ्यावर आजही अपार विश्वास टाकला आहेस, या जाणिवेने मी आत्ममग्न... आत्मतृप्त व्हायचो.

आजही तू हा प्रश्न विचारला नसतास तर...

विचारणार नव्हतेही.

तू येतोस. वर्षाची मरगळ टाकून जातोस. तृप्त नि ताजातवाना होऊन जातोस. पण मी इथून जाते रिती होऊन.

तीन चार दिवस जगायचं नि पुन्हा अंधार सोसायसाठी निघून जायचं.

मी हा प्रश्न विचारायला नको होता.

पण उद्याच्या वेदनांची चित्रं मनासमोर पिंगायला लागतात आणि मग हे सुख सोसवेनासं होतं.

तो : मी तृप्त होऊन जातो! इथून परतताना माझ्या मनाचे पिसार फुलारून येतात!! (तरीही). मी सतरा वर्षापूर्वी तुला दिलेली निळी साडी नेसून तू एअर पोर्टवर आलेली असतेस. मला माहीत असतं की तुझ्या उसन्या हसण्यामागं प्रचंड थैमान आहे अश्रूंचं. अश्रू, जे मी माझ्या हातांनी निर्माण केले.

त्या अदृश्य अश्रूंनी माझ्या तृप्त रक्ताच्या साऱ्या जखमा उलून येतात.

वाटतं, स्वतःलाच संपवून टाकलं तर सगळ्या यातना...

ती : मी हा प्रश्न विचारायला नको होता...

पण आज विचारावासा वाटला. गेली सात वर्षं हा प्रश्न मनात निर्माणच झाला नाही.

पण यावेळी फार असुरक्षित वाटतंय.

हे इथं असं किती वर्षं यायचं ? का यायचं ?

रक्तात गुल्मोहरी बसंत फुलवून घेण्यासाठी केवळ यायचं ? की दोन हजार मैलांवर घरकुलातले व्यवहार सांभाळणारा तू फक्त माझाच आहेस या जाणिवांचे आभाळ कवेत घेऊन तृप्त होण्यासाठी इथं यायचं ?

रक्त खरं की मनाचं आभाळ खरं ?

आज प्रत्येक क्षण हातातून सुटलेला...... असुरक्षित वाटतोय...

तरीही हा प्रश्न मी विचारायला नको होता.

गो : तू हा प्रश्न पहिल्या वर्षीच विचारला असतास तर कदाचित नंतरची सात वर्षं निर्माणच झाली नसती.

तुला लिहिण्यापूर्वी शेकडो रात्री मी माझ्याशीच झुंजत होतो.

मिल्कबरीला आल्यापासून घरचे, दारचे सारे संबंध तोडून टाकले मी.

पूर्वेकडून येणारा वाराही मला नको होता. अनील... जेकब वा सागर कुणाच्या पत्राला उत्तर पाठवलं नाही मी. त्यांच्या पत्रातला तुझा ओझरता उल्लेख माझ्या सहनशक्ती–पलीकडचा होता. सगळे दोर मी माझ्या हातांनी छाटले होते. एका दुबळ्या क्षणानं माझ्यासमोर परदेश प्रवासाचं... तिथल्या झगमगीत जीवनाचं स्वप्न उभं केलं. त्या स्वप्नांसाठी मनाचा बळी देताना काहीच वाटलं नाही. लग्नाच्या तिसऱ्या दिवशी ऊर्मिलाला घेऊन स्वप्नांच्या देशात भरारी मारली. पहिल्याच रात्री लक्षात आलं की दोन तपकिरी डोळे माझा पाठलाग करताहेत. त्या डोळ्यांचा सूड घेण्याच्या ईर्षेनं मी ऊर्मिलेवर प्रेमाचा वर्षाव करीत राहिलो. पण तृप्तीच्या प्रत्येक क्षणी अंतर्मनाला जाणवायचं, हा वर्षाव वासनांचा आहे. ही तृप्ती वासनांची आहे. पूर्ततेच्या प्रत्येक क्षणीं भित खोल खोल खचत जायची.

अ : तू असं बोलताना ऊर्मिलेवर अन्याय करतो आहेस.

तुझ्या रक्तातली वासना तिनं भावनांचे कोष विणून झेलली असेल. स्वतःतच हरवून जाणारी माणसं, स्वतःला जोजवण्यात इतकी मग्न होतात की इतरांच्या मनाचा विचार

त्यांच्यासाठी असंभवनीय ठरतो. हातांनी कुरतडून टाकलेल्या फुलांच्या वेदना, आणि रक्तकोमल पावलांखाली चुरडल्या गेलेल्या फुलांच्या वेदना ...

दोन्हीही वेदनाच !

जन्माचं अस्तित्व चिरत जाणाऱ्या ...

खरंच हा प्रश्न मी विचारायला नको होता.

ती : असं म्हणून माझ्यावर अन्याय करू नकोस.

तिच्या माझ्यातलं नातं शरीराच्या माध्यमातूनच निर्माण होणार होतं. मंत्रांच्या अक्षरांची उदात्त झालर लावली तरी सर्वांच्या साक्षीनं दिला गेलेला तो परवानाच होता. आमच्या शरीरांना एकत्र येण्याचा ! पण मल्मली शरीरांच्या आत गुंडाळलेलं असतं एक मन.

शरीराचे पापुद्रे सोलताना मनाची नाती जुळतील असं वाटलं होतं. एका बेसावध क्षणी घेतलेला निर्णय ... तपकिरी व्याकूळ डोळे विसरायला लावणारा नवा बंध निर्माण होईल अशी आशा वाटली होती.

पण ...

बापाचा प्रचंड पैसा, त्या पैशाच्या बळावर मिळालेला देखणा पती आणि परदेशातलं अद्‌भुत जीवन यांच्या नव्या कैफात ऊर्मिलेला मला शोधावंसंच वाटलं नाही.

मी वरवर चढत होतो. युनिव्हर्सिटीत स्टॅटिस्टिक्स डिपार्टमेंटचा प्रमुख झालो. दोन पुस्तकं माझ्या नावावर आली. पैशाचा प्रचंड ओघ अंगावर आदळत होता.

पण आम्ही एकमेकांना सापडलोच नाही. हाती लागली फक्त शरीरं. भर प्रवाहात आत्महत्या करणाराचे कपडे हाती

यावेत तशी. मग दोन तपकिरी डोळे चुकवणं अशक्य होऊ लागलं. त्या दोन डोळयांनी मला दिलेला विश्वास, स्वप्नांचे कोवळे कोंभ ... सारं आठवू लागलं. प्रतारणेच्या पापानं आतल्या आत जळणाऱ्या मला एकाच प्रायश्चित्ताचा ध्यास लागला. त्या दोन डोळयांना भेटण्याचा.

तुला पत्र लिहिलं.

तुझं उत्तर आलं.

तुझा पत्ता जुनाच होता. नावही तेच, न बदललेलंल. मी पराभूत झालो होतो. डंख सोसूनही तू उभीच होतीस.

ती : मरण नाकारता येत नाही तशा वेदनाही नाकारता येत नाहीत.

त्या कुरवाळाव्याच लागतात. दुखऱ्या हातांनी त्या कुरवाळतानाच कधीतरी, नकळत

त्यांच्यावर प्रेम करायला लागतो आपण !

वेदनांच्या वळांचा जांभळा धुंद थर आयुष्यावर चढत जातो.

त्या थराखाली भूतभविष्यवर्तमान सारेच गाडले जातात. तो थर कुरतडून काढण्याचं ... नव्या आभाळाखाली जाण्याचं बळ, बळी गेलेल्या मनात कधीच येत नाही. एकच गोष्ट फक्त हातात उरते. आपली इमेज आपणच जपत राहणं.

तू स्टेटस्‌मध्ये सेटल झाल्यावर दोन वर्षांनी अनिलनं मला विचारलं होतं.

तुझ्या माझ्या प्रेमाचा मनस्वी साक्षीदार तो.

तू केलेल्या प्रतारणेचं प्रायश्चित्त घेण्याच्या त्याच्या उदात्त कल्पनांना बळी जाणं मला नको होतं.

त्यापेक्षा माझ्या वेदनांच्या स्वयंभू चांदण्या कुरवाळणं अधिक परवडणारं होतं.

उदात्त कल्पनांचं काहूर मनात बाळगणाऱ्या माणसांचे पाय जमिनीच्या आधारानं उभे असतात, याचं भान मला तू देऊन गेला होतास.

तुझं पत्र आलं. पंधरा शब्दांचं.

ऋता.

तुला विसराचा प्रयत्न करतोय.

अशक्य आहे.

बावीस मे ला माथेरानला येत आहे.

तू येशील ना ?

— विश्वनाथ.

शब्दांचं वांझपण भोगलेली मी.

आनंदाच्या पलीकडं केव्हाच गेलेली.

पण शब्दांना गर्भ देण्याची सवय जाता जात नाही.

त्या शब्दांतून तुझ्या अतृप्त मनाचा तळ मला दिसला. इच्छा नसतानाही यावं लागलं.

वाटलं. एकदा बळी दिला आहे. तो पुरा द्यायला हवा.

सगळं साग्रसंगीत व्हायला हवं. होऊन जाऊ दे ...

ना : बळी देण्यासाठी तू इथं आलीस ? आठ वर्षं येत होतीस ?

नी : नाही फक्त पहिल्यांदा आले. पण बळी जाण्याऐवजी फुलतच गेले. माझ्यावरचा काळाजांभळा थर तुझ्या हळुवार हातांनी खरवडून टाकलास. निळ्या आभाळाचा रेशमी रंग पुन्हा एकदा माझ्या डोळ्यांनी पाहिला.

मी कुठं असते ? कोण आहे ... ? कशी आहे ? असले प्रश्न विचारले नाहीस. मलाही प्रश्न विचारावेसे वाटले नाहीत. वर्षांतून फक्त चार दिवस जगत होते मी. ते जगणं इतकं सुंदर ... इतकं निहार की उरलेल्या तीनशेसाठ दिवसांचं रितेपण सहज सोसता यावं. तू येत राहिलास.

मीही येत राहिले.

गेली आठ वर्षं येतेय. पण आज नितांत असुरक्षित वाटतंय. फार असुरक्षित ... ! ! !

: गेल्या आठ वर्षांत एवढाही विश्वास निर्माण करू शकलो नाही मी ?

: त्या विश्वासावरच येत होते, पण तो एक गोड भास होता असं आज वाटतंय.

स्पर्शाची ओढ तुला नव्हती. मलाही नव्हती.

जुन्या आठवणींचे बिलोरी तुकडे जुळवीत राहायचं. जुनी, वेडी नि खुळी प्रतिबिंबं पाहताना मोहरून जायचं. मुक्त मनानं भटकायचं. खूप बोलायचं. कित्येक लेखकांच्या कवींच्या साक्षी निघायच्या. तुझ्या डिपार्टमेंटमधल्या गमती जमती ... जीवनातले कुबट चिखली वास उडून जायचे. एकमेकांच्या जवळ यायला शब्द अधुरे पडले तेव्हा अपरिहार्यपणे ... नकळत एकमेकाचे झालो. स्पर्शाला नाकारण्याचा करंटेपणा मनातही आला नाही.

अंधाऱ्या रात्री काळ्या पाण्यातून लक्षावधी दिवे तरंगत जावेत तसं रक्त झगमगून जायचं. रक्तातून गुलमोहर फुलायचे.

पण आज रक्तातले निखार विझू आले आहेत.

या अवघड क्षणी वाटतंय, हे गुलमोहर पेटवून घेण्यासाठी तर येत नव्हतो आपण ?

गेल्या दोन वर्षात निर्मुक्त हिंडणं ... अनिमिष गप्पा मारणं कमी झालंय. कळत नकळत आपणही रक्ताच्या प्रवाहात वाहून गेलो होतो.

कळत नकळत मलाही ध्यास लागला होता, रक्तातून उसळणाऱ्या चन्द्रफुलांचा. चन्द्रफुलांचा बहर उतरत आला आहे. उद्या उतरणार आहे.

मग उरेल विझलेली मातीची कुंडी. त्या मातीच्या कुंडीच्या ओढीनं येशील तू ? येईन मी ?

तो : अन्याय करते आहेस ऋता ...

ती : हा अन्याय नाही. सत्यालाही सामोरं जावं लागतं. व्यवहार म्हणून का होईना, तू ऊर्मिलेला दोन मुलं दिली आहेस. सुरक्षितता दिली आहेस.

चौकटीतल्या सुरक्षिततेच्या पलीकडं गेले आहे मी. मला हवी आहे पाखर. अपार मायेची. अस्फुट शब्दांच्या निरंतर उबेची दोन हजार मैलांवरून कशी देणार आहेस तू ?

तू इथं येतोस हे माहीत असूनही 'तीन चोक बारा ' च्या हिशोबानं तुझा संसार करणारी ऊर्मिला या क्षणी खूप सेफ आहे ...

तिला माहित आहे तू इथं येतोस ते ?

तो : नाही.

ज्ञाताच्या कुंपणापलीकडचं जग मला निर्माण करायचं होतं.

ते मी इथं निर्माण केलं. माझ्या जगातले वारे मला इथं नको होते.

दिव्याकृतींच्या दिव्य गीती गात झपूर्झा व्हायचं होतं मला.

तुझे हिसकाटून घेतलेले क्षण तुला द्यायचे होते. मला हवं असलेल निगूढ गीत देण्याचं सामर्थ्य फक्त तुझ्यात होतं.

फक्त तू हवी होतीस मला. तुझ्या माझ्यावर असलेल्या विश्वासासकट. निष्ठेसकट.

शिरीषावरचा पोपटी बहार फक्त चार दिवसांचा असतो.

झुलत्या झिळमिळयांतून मोकळे होणारे गंध उत्तर रात्री वाऱ्यावरून दू ऽऽ र दू ऽऽ र पसरतात.

त्या गंधांनं अवघं मन भरून जातं.

मग त्या गंधांच्या स्मृतींनी ग्रीष्मालाही ओलावा येतो.

वर्षभर मी जगायचो, मे महिन्याची वाट पाहात. इथून परतताना तृप्तीत असायची निरंतरची अतृप्तता.

आणि अतृप्ततेत तृप्तीची अथांग जाणीव ... पण आज लक्षात येतंय.

तृप्तीसाठी धावणारा मी, नकळत तुझ्यातल्या 'स्त्री'ला जागवतोय याचं भानच उरलं नाही.

या प्रश्नानं तू ते भान दिलसं.

या क्षणी वाटतंय या पूर्वीच तू हा प्रश्न विचारला असता तर ... ?

नी : होय फार उशीर झालाय.

मला हवी असलेली सुरक्षितता देण्याचं बळ तुझ्या या जगात नाही आणि त्याही जगात नाहीं.

हा प्रश्न विचारायलाच नको होता.

तुझ्या तृप्तीचं सुख नासवून टाकायचं नव्हतं मला.

पण बळी जाताना ... मरणाची गुदमर सोसताना एक अस्फुट किंकाळी नकळत उमटून जाते.

तसाच हा प्रश्न.

हा प्रश्न विचारायला नको होता मी ... नको होता ... नको होता ...

* *

# एका गांधारीच्या डायरीतली काही पाने

३–५–७१

आज मुंबईचे पाहुणे पाहून गेले. गेली दोन वर्षं हा बाजार दर पंधरा दिवसांनी भरत असतो. याही वेळी माल नापसंत पडणार... हे असं दाखवून घेताना, प्रत्येकासमोर गुळचिट् हसताना मनात येतं, दर संध्याकाळी वेश्या हेच करतात. हसायचं नि सावज पकडायचं.

स्वत:ची विलक्षण घृणा येते. मी पदवीधर आहे; पण माझ्यात नि माझ्या आजीत कोणता फरक पडला ? आजीही दहा ठिकाणी दाखविली गेली असेल. मग सौदा... आणि शेवटी वंशासाठी दिवा लावणं वगैरे...

मनातले विचार मनातच रिचवावे लागतात. सुंदर असते तर हा पिंजरा तोडून भरार होण्याची ताकद मनाला मिळाली असती. श्यामल कर्णीकनं आईबापाच्या नाकावर टिचून पंजाब्याशी लग्न केलंय. तिच्या आईला कायस्थपणाचा केवढा अभिमान ! रूप नडतं आमचं. शेवटी याच रस्त्यानं मार्गी लागायची आमची गाडी.

८–५–७१

त्या मुंबईकरानं चक्क पसंत केलंय मला.

तो सोन्यासारख्या झळझळीत रंगाचा, मी अशी सावळी तुळस. उभार बांधा नि दाट रेशमी केस. हीच जमेची बाजू.

बरं झालं. आओ मोकळी झाली.

भावाच्या संसारात ती नि मी अडचणच आहोत.

२५–५–७१

रूढी किती सुंदर असतात !

दाखवून घेण्यातल्या साऱ्या यातना आता विझून गेल्या आहेत. दहा द्रिवसांनी लग्न. हे दहा दिवस युगासारखेच भासताहेत. माझं घर ! माझ्या एकटीचं... फक्त माझंच असलेलं एक नवं धन !

माझ्या स्वप्नांना प्राण देणारे फक्त माझे अनंत !

नावगाव सगळं पुसून नवं रूप घेणारेय मी. राखेतून नव्या क्षितिजाकडे झेपावणाऱ्या फिनिक्स पक्षाचे पंख मला फुटणार आहेत.

मी सुंदर होणारेय्...

६–६–७१

केवढी प्रचंड आहे मुंबई ! घनदाट अरण्यात वाट चुकून जावी तसं मन भेदरून गेलंय. लग्नानंतरचा प्रसंग सारखा आठवतो आहे. नाव ठेवायच्या वेळी वाटलं होतं की सुरेखसं नाव मिळेल. दुर्गा या नावाची शिसारी वाटते मला. बैंगणी मळकट लुगड्याच्या रंगाचं नाव, पण ' दुर्गा ' नावच ताटात

लिहिलं. मी यांच्याकडे हळूचं पाहिलं. त्यांचा चेहरा निर्विकार होता... कोरा करकरीत...आज पहिली भेट. मन धास्तावलंय. घरात ना सासू ना नणंद. जाऊबाई परस्पर गावी गेल्या. आनंदाच्या क्षणी सुद्धा आधार हवासा वाटतो मनाला.

१८–७–७१

वैवाहिक जीवनाची किती मोहक चित्रं रेखाटली होती मी ! माझ्या रूपावर नाराज असतील अनंत ?

खूप बोलावसं वाटतं... विचारावसं वाटतं; पण त्यांचे ओठ सदा मिटलेले. स्वभावच असावा तसा.

पुरुष खूप अधीर असतात म्हणे ! मिनी... शमी काही-बाही सांगायच्या. अनंत कसे इतके शांत ?

वेगवान वादळं दौडत यावीत आणि त्यात केव्हा वाहून जावं ते उमजूच नये... असा अनुभव, पण वादळं आलीच नाहीत.

चंद्रज्योतीची फुलं. उंच... उंच उडावीत नि ऐन क्षणी विझून जावीत तसे अनुभव !

शेजारी अनंत शांत झोपलेले. मी जागीच. धुमसत्या राखेसारखी.

२५–८–७१

आसपास ओळखी होऊ लागल्या आहेत. आम्ही दोघं जवळ यायला लागलो आहोत.

मी आज विचारलं, ‘माझ्यासारखी काळी मैना कशी पसंत केलीत ?’ ते गोडसं हसले नि म्हणाले, ‘कुणापाशी तरी

रूप असलं म्हणजे झालं ! आणि तुझं मन हवंय मला. रूप फार लवकर हरवतं...'

खूप... खूप सुखावले मी. माझ्या मनात आलं, हे गोरं देखण रूप, भरदार छाती, दाट कुरळे केस... हे सगळं माझं आहे...

फक्त माझं... ! !

२९–९–७१

घरी खूप प्रेमळ आहेत. पण लग्न झाल्यापासून एकदाही बाहेर नेलं नाही. कदाचित लाजही वाटत असेल.

काल हट्टच धरला, सिनेमाला जाऊ म्हणून. मुष्किलीनं तयार झाले.

अलिशान सिनेमागृह. पायाखाली मखमली रुजामा. चौबाजूंनी आरसे. पुढे हे नि मागे मी. मी दिमाखानं चालतेय. इतक्यात समोरून एक देखणा, रुबाबदार तरुण आला. नि मागं होती एक तेलकट रंगाची मुलगी. माझा सगळा दिमाख गळून पडला तरीही मन सावरून बसले. मध्यंतरात कुणीसं हाका मारीत होतं. यांनी वळून पाहिलं. एक जाडगेली बाई होती... खूप गोरी. सपिटाच्या लगद्यासारखी. ओठाला जास्वंदी रंग. मोठा हेअर डू !

' हाय अनंत हाय अनंत ! ! ' करीत, हातावर चापटचा मारीत ती बोलत होती.

मध्यतंर संपलं.

...मूल गेलेल्या जयाची भकास मुद्रा...

अनंतचा मूड गेला असावा. ते उठून बाहेर. मीही मागो-माग. मग थेट घरीच. कालपासून बोलेनासेच झालेत.

३–१२–७१

शेजारची उमा रघुराजन विचारत होती. तुझे मिस्टर कोणत्या फर्ममध्ये आहेत ?

काय खुळी आहे मी ! गेल्या सहा महिन्यांत नवऱ्याच्या नोकरीची सुद्धा चौकशी केली नाही मी. दादांनी मुलगा पसंत केला. मी माळ घातली. फक्त डिग्री कानांनी ऐकून घेतली.

आधी ओळख शरीराची; मग मनाची.

घरात सोफा आहे. प्रेशर कुकर आहे. शिवाय फ्रायपॅन, मिक्सी, टोस्टर... सगळं काही आहे. सोनेरी फ्रेममध्ये दिमाखणारी डिग्री बैठकीत आहे. मी तरी कशाला कराव्यात नसत्या चौकशा ?

तरी पण आज विचारणार आहे...

१४–१–७२

काय विचित्र नोकरी आहे यांची ! सकाळी दहापर्यंत घोरत पडायचं नि मग जेवून जे जायचं ते थेट रात्रीपर्यंत. मग रात्रीचे दोन काय आणि चार काय... इतकं थकून यायचं की ग्लासभर दूध घेऊन बिछान्यावर आडवं झाल्यावर एका सेकंदात झोप. बाजूला तरुण बायको आहे याचीही दाद नाही.

आज संक्रांत. मी आणि उमानं जाऊन सुंदर साडी आणलीय आज. पहिल्या संक्रांतीला काळी चंद्रकळा नेसून

स्वागत करायचं असतं नवऱ्याचं. मी पांढरीशुभ्र साडी आणलीय. वर हलके काळे बुंदके. साडी नेसून केव्हाची वाट बघतेय. वारा वाजून गेलेत; पण अजून पत्ता नाही !

कधी कधी मन खूप उदासतं, आता या क्षणीही... मी पदवीधर आहे. सुशिक्षित आहे.

गांधारीसारखे डोळे बांधून जगता येईल मला ?...

४–३–७२

समोरच्या फ्लॅटमधली सुरैना सागर आली होती. खूप गप्पा मारल्या. उमाची नि हिची ओळख आहे जुनी. आठ दिवसापूर्वीच आलीय. ही ' ब्लू नाईल ' मध्ये रिसेप्शनिस्ट आहे.

~~पूर्वीच आलीय, ही ' ब्लू नाअील ' मध्ये रिसेप्शनिस्ट आहे.~~

भुरे ... सोनेरी केस. मोठ्ठे डोळे. काहीसा सावळा तरीही तकतकीत रंग. किती गोड दिसते. !

बटाटेवडे नि हैद्राबादी आलं-लसणीचं झणझणीत लोणचं दिलंन् तिला. अधाशासारखं खाल्लंन् लोणच्चं. म्हणाली,

' माझ्या हॉटेल–मॅनेजरनं हे लोणचं खाल्लं तर धावत येअील तुला न्यायला ! '

सुरैना असतानाच आज अचानक अनंत आले. केवढे दचकले आणि बाहेरच्या बाहेर पुन्हा सटकले.

काय ' गूढ ' आहे अुकलत नाही. मी खोलखोल रुततेय असं सारखं वाटत राहतं.

Swami Ramanand Teerth Granthalaya Ambajogai Mahavidyalaya

दादांनी लग्न करून दिलं. जबाबदारी संपवून टाकली. आईला भेटावंसं वाटतंय.

मनातला गुंता आता सोसवत नाही.

९-३-७३

परवा इथं आओकडे आले. अनंतनी नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांनी 'तू गेल्यावर करमणार नाही !' म्हणावं. जाऊ नकोस म्हणावं ! ' असं खूप वाटत होतं.

पण ...

'केव्हा येऊ ? ' विचारलं तर म्हणाले, 'केव्हाही ये. तुझ्या सोयीनं '.

खूप दिवस राहायचं ठरवून आले होते.

इथं आले तर किती परकं वाटतंय !

माझ्या अस्तित्वाच्या खुणा जणू पुसून गेल्या आहेत या घरच्या ... ज्या घरात वयाचीं पंचवीस वर्षं घालवलीं, ते घर अवघ्या एक वर्षात इतकं दूर जावं ?

फक्त आई मन गुंतवते.

परवा निश्चित केलं मनानी.

अनंत कसेही असोत; कुणीही असोत. त्यांनी मला माझं दिलंय घर. हक्काचं घर ...

5070

१५-६-७३

काल परतले इथं. आठ दिवसांचं दूरपण. अनंत काल तरी लवकर येतील असं वाटलं होतं; पण कालही खूप

उशिरा परतले. खूप थकलेले. दारूचा मंद दर्प. तब्बेतही उतरलेली वाटली.

पूर्ण रात्र मी जागीच ...

मन आणि शरीर, दोहोत कर्तसवरतं असतं मन. मनानं दिलेले संकेत शरीरानं पाळायचे. मन, शरीर यांचं वेगळेपण कधी जाणवलंच नव्हतं आजवर.

पण काल शरीराचं वेगळं ... बंडखोर अस्तित्व जाणवलं मला. रक्त कापरागत चरचरत जळत होतं. हातही निर्लज्ज. यांना जागे करणारे.

गाढ झोपेतून अनंत चाळवले.

' ओह् ऽऽ नो, रेणू ! मी खूप थकलोय. लेट मी स्लीप. नो एनर्जी अॅट ऑल ... '

माझं मन थाड्कन् जाग्यावर आलं.

शरीराची घृणा वाटली स्वत:च्या.

कोण ही रेणू ?

... तिला तृप्त करू पाहताना थकलेले अनंत कोण ?

१७–६–७३

हल्ली उमा सारखी सुरैनाकडे जाते. उमाचा किती आधार वाटतो मला. अशात आली नाही. नुसती हसते.

काल आईचं पत्र आलंय. दमा उठलाय तिचा. तिला बोलवावसं वाटतं, पण दुसऱ्या क्षणी मनात येतं – दुरूनच ठीक आहे. कुणी येऊ नये नि कुठं जाऊ नये, आपल्या जखमा आपण झाकूनपाकून सोसाव्यात.

२५–७–७३

गेल्या काही दिवसांत खूप दूऽऽर चालून आलेय मी. पण कुणापासून दूर ?

कधी कुणाच्या जवळ होते मी ?

कित्येक तासांत संभाषण नाही. शब्दांचं अस्तित्व संपून गेलंय ... अनंत केविलवाणेपणानं इकडेतिकडे करतात.

त्यांची ती नजर पाहिली की मन पेटून उठतं. सगळं ढोंग आहे. घरातून निघून जायला पाय ओढताहेत.

कुठं जाऊ पण ? कुणाच्या घरी ? हातातल्या अगदी भेंडोळ्याला फक्त कागदाचीच किंमत आहे.

याउंबरठ्यापलीकडे काय आहे माझं ?

२६–७–७३

दुपारच्या टपालानं अनंतचं पत्र आलं आहे.

एका घरात राहून पोस्टानं पत्र पाठवण्याची वेळ यावी ?

दुर्गा,

तुला प्रिय म्हणण्याचा अधिकार लग्नापूर्वीच मी गमावला आहे. डिग्रीचं भेंडोळं घेऊन या महानगरीत आलो. साथीला होती स्वप्नांची आरास. प्रत्येक नकारासोबत विझत जाणारी.

डिग्री नाही, तर माझं देखणं रूप कामाला आलं.

एका अलिशान हॉटेलात रिसेप्शनिस्टची नोकरी. सुंदर कपडे ... खळाळतं जीवन. दिमाखदार नट्या. मलईदार बायका; बड्या उद्योगपतींच्या. नेहेमी यायच्या. त्यांना कंपनी द्यायची. पहिल्यांदा नुस्ती कंपनी. पुढेपुढे त्या मागतील ते.

एक क्षण असा आला, तिथून मागची वाट तुटली होती. मग मॅनेजर सांगेल तिला खास संगत द्यायची. तिला तृप्त करायचं.

माझा कोवळा दुधाळ रंग ... दणकट बांधा नि गाभुळे हळवे डोळे अनेकजणींना हवेसे वाटायचे.

खूप पैसा मिळायचा. कधीतरी घरी जायचो. दादा – वहिनींचा हळूवार संसार पाहून पैसा खुपायला लागायचा. आपण संपलो असल्याची जाणीव चिरत जायची.

खरं तर लग्न करायला नको होतं ...

लग्न ... तो एक खुळा सूड होता. दादा – वहिनींच्या संसारावर उगवलेला. तू नकळत बळी गेलीस. कुरूप बाईला मन नसतं असा माझा निखालस समज तो खोटा ठरला. तुझं कोवळं मन मला दिसायचं नि ते हवंसंही वाटायचं. तू माझ्या संसारात स्वत:ला मुरवून घेत होतीस. तुझं ते विर्घळणं पाहून मी हादरून जात होतो.

तुझं अस्तित्व मला माझ्या पापांची दहशत घालीत होतं.

मी हा असा आहे.

नकळत जाळ्यात सापडलेला असहाय किडा. या जाळ्याचे रसतंतू इतके जिवंत आहेत की सजीव सुटून येणं कठीण. तरीही शपथपूर्वक सांगतो, माझं मन तुझ्यात गुंतलंय. माझं अपवित्र शरीर ... पण तृप्त घरकुलाचं स्वप्न तू मला क्षणभर का होईना, देऊ केलं होतंस.

तुझ्या निष्ठेनं भाजून निघतोय मी.

तू कुठंही जाऊ शकतेस. तुझ्या यातना पाहवत नाहीत. कपाटात पैसे आहेत. तुला उपयोगी पडतील ... ...

अनंत

अनंतचं हे पत्र. घरट्यातून खाली पडलेलं जखमी पिलू तळहातावर थरथरतंय. हे पिल्लू खाली टाकून पाठ फिरवून जाऊ मी ? की त्या जखमांवरून हात फिरवीत राहू ?

* *

# सांगण्यासारखं काहीच उरलं नाहीये..

मिलू, बेटा डॅडींनी स्टेटस्‌हून आणलेली जर्सी घातली नाहीस तू एकदाही. आणि तुझा बर्थ–डे जवळ आलाय. कुणाकुणाला बोलावायचं नि काय काय करायचं तेही सांग ना ! "

मिलिंद घुम्म.

मम्मी विणण्यात गर्क. टाक्यावरची नजर ढिली न करता ती विचारतच राहते.

'नारळाच्या करंज्या, मटरपॅटिस नि अंबा आईस्क्रीम करू या का नि रार्चूच्या मैत्रिणी आणि तुझे मित्र बोलवूया. कामाच्या रगाड्यातसुद्धा तुझे डॅडी तुझा वाढदिवस विसरले नाहीत. त्यांच्या एकुलत्या एक मुलाचा वाढदिवस आहे ना ! तो आता मोठा होणार. अठरा वर्षाचा, नि मी म्हणे लक्षच देत नाही त्याच्याकडे ! होय रे बिट्टू ? '

मम्मी दोन वर्षाच्या पोराशी बोलावं तशी लाडंलाड बोलते. ती तशी बोलायला लागली की जाम बोअर होतं. निव्वळ

सिनेमातल्या ममीसारखी वाटायला लागते.

'ह्यँ ! वाढदिवस कसला साजरा करतेस ? वाढदिवस, पार्ट्या, फुलांचे हार, ते खोटंखोटं हसणं. आय हेट ऑल दीज् थिंग्ज. सॉरी माँ. टेल डॅडी.'

ममी हातातला टाका तसाच सोडून मिलूकडे बघत राहते.

गेल्या वर्षापासून मिलू बदलत चाललाय. विलक्षण बदलत चाललाय.

मिलू ... नुक्ता जन्मलेला साडेआठ पौंडी गोळा. कोवळ्या पिंपळपानासारखा. गुलाबी, लसलुशीत.

मिलू ... नायकाच्या हातातली कोंबडीची तंगडी मागणारा, रडूनरडून थिएटरभर गोंधळ माजवणारा.

मिलू ... ममीला 'माँच' म्हणणार म्हणून हट्ट धरणारा नि डॅडींच्या हातून मार खाणारा मिलू.

कितीतरी रंगीबेरंगी चित्रे ममीच्या नजरेसमोरून तरळून जातात.

दिवस किती भरारा जातात, मिलूच्या खेपेचे सगळेसगळे क्षण जसेच्या तसे आठवताहेत. जणू कालपरवाच जन्मलाय मिलिंद. गेल्या वर्षी दोन वर्षांत किती बदललाय मिलू. हट्ट नाही. हसणं नाही, डोळे नेहमी कुठंतरी हरवलेले, जणू खूप दूरदूरच्या प्रवासाला निघालेत. ती थरकन शहारते. मिलिंदकडे एक नजर टाकून उठून आत जाते.

ममीचा अस्फुट उसासा त्याला जाणवला. गेलं वर्षभर या घरात मनच रमत नाही. गाडी ··· एवढा मोठा बंगला ···

समोरची हिरवळ ··· सदा चुस्त तुस्त दिसणारे, डॅडी, डॅडी - भोवती नि मिलूराधाभोवती भिरभिरणारी ममी. या सगळ्या गर्दीत आपण एकटे आहोत. सुटेसुटे आहोत ही जाणीव कापीतच राहते.

" मनोर ··· मनोर ··· " डॅडी थेट ममीपाशी.

पूर्वी डॅडी ममीला 'रमा' म्हणायचे. या बंगल्यात आल्यापासून हे नवंच नाव काढलय. 'मनोर' बंगल्याचे नाव तेच. कदाचित नाव आधी नि मग बंगला बांधला असेल. पण साधारणपणे दोनही एकाच वेळच्या गोष्टी.

तर डॅडी थेट ममीजवळ.

" यू मस्ट कम् मनोर. "

" मला काही इंटरेस्ट येत नाही हो त्या ओल्या पार्टीत."

" बट अदर्स आर इंटरेस्टेड अिन् यू. "

" छी : ··· ! ! "

" छी : काय ! रिअली मना. वाटतच नाही तू चाळीशी ओलांडली आहेस हे. आमचा संन्याल तर हिरवा चाफा म्हणतो तुला. यू मस्ट– "

' प्लीज. अरविंद. आग्रह नको करू. '

' मिलिंदला आवडत नसावं हे सारं. अलीकडे किती घुमा झालाय. अरू तुम्हीही लक्ष द्यायला हवं त्याच्याकडे. एकोणीसावं लागणार परवा त्याला. '

ममीचा घुसमटता आवाज.

' स्टेटस्ला गेलो केवढे कपडे आणले. जपानहून आणलेली खेळणी तर घरभर साक्षी आहेत नि मी त्याच्याकडे लक्षच

देत नाही ? औरच आहेस. तुझ्याच मनाच्या खुळचा कल्पना. वाढतं वय आहे. या वयात पोरं थोडी घुसमटतातच.'

'गेट रेडी.'

'हॅलो मिलिंद. मम्मीकडून उद्या अठराशेचा चेक घे. बाय व्हाट एव्हर यू लाईक. १८ वर्षांचा तरुण होणार माझा बच्चा. मिस्टर आम्हाला म्हातारं व्हा म्हणू नका हं. ...'

तो काही बोलायच्या आत पाठीवर थाप मारून डॅडी निघून गेलेले.

'मिलू नॉट फीलिंग वेल ?' ममी कपाळावर हात ठेवीत जवळ येऊन विचारते.

'नथिंग ममी. उगाच काळजी करते बुवा तू. आता काय कुक्कुलं बाळ आहे मी ?' तिचा हात अलगद दूर करीत तो म्हणतो. खरं तर त्या क्षणीं ममीचा हात घट्ट धरून ठेवावासा वाटतो. ममीचा हात खूप लुसलुशीत आहे. पुरणाच्या पोळी-सारखा नि मंदसर उष्णसा.

'जरा बाहेर जाऊन येतो ग.' असं म्हणत तो पायात चप्पल सरकवतो नि बाहेर येतो.

रूपालीत कडक कॉफी घेतली की डोक्याचा ठणका थांबेलसं वाटतं. तो रूपालीत शिरतो. तिथं बघावं तेव्हा पोरीपोरांचा थवा लवथवलेला असतो.

'ए काल पियूला आम्ही जाम पिळलं किनई रेखा ?'

'साला ती अनिता देख, अरे देख यार जल्दी. दिल थंडा हो जाएगा. काय चालतेय ! मरलिन मन्रो स्वर्गातही जळत असेल रे ... हाऽऽय !'

'ए तो 'स्मार्टी' बघ नि किती मस्त दिसतोय नाही?

बेलस् ... रंगीबेरंगी चेक्स...झुलत्या रिंग्ज...सिगरेटच्या धुरांची कडवट वलयं नि लाडेलाडे किनरे आवाज.

तो वैतागून उठतो नि डेक्कनवर जाऊन उभा राहतो.

'हॅलो मिलिंद. कुठं?' गिरीधरने पाठीवर थाप मारीत विचारले.

'कुठं नाही यार. घरात बोअर झालो म्हणून रस्त्यावर आलो. साला रस्त्यावरही बोअरच.'

'येणार मिटिंगला? आजकाल फिरकला नाहीस तू. विजयचं तू भलतंच मनाला लावून घेतलेलं दिसतंय. साला त्याच्या बोलण्याचं सोड रे. पण काय तुफान डेडिकेशन आहे! आपण तर मरतो त्याच्यावर. नंतर खूप वाईट वाटलं त्याला.

... ... ... ... ...

बड्या ऑफिसरचं पोर म्हटलं की जाम संशयी बनतो तो. त्याला कारणंही तशीच आहेत.

छोडो ... ...

'चलणार?'

गिरिधरबरोबर तो चालू लागतो.

आज विजय त्याच्याकडे पाहून छानसं हसतोय. खूप रिलीफ मिळाल्यासारखं वाटलं. विजय खूप वाळलाय. हाताची बोटंसुद्धा कशी राठराठ झाली आहेत नि पायांचे पंजेही भेगाळले आहेत. त्याचा देखणा चेहरा काहीसा रापलाय. पण डोळे आणखीनच तेज झालेत. पाहिलं की खस्‌कन् खुपसते नजर.

‘ काय मिलिंद, सुट्टीत शिविराला येणार ? अरे, बघ तर खरे येऊन. नाचणीची भाकरी नि उडदाचं वरण खावं लागेल. मात्र तेही छान लागतं. ’ विजय विचारतो.

आज अरुणाही आलीय.

ती दोन महिने जाऊन राहणार आहे म्हणे डोंगरकड्याला.

‘ काय तुफान नाचतात बाया. टोपले नि सूप असं क्लास नाचवतात ! रात्रभर नाचत होतो आम्ही ढोलाच्या तालावर. अरुणा, विजा नि दिलीपसुद्धा नाचले. रिअली सोमावलहून आल्यापासून मन घरात रमतच नाही. दहादहा कोसावरून चालत येणाऱ्या त्या भिल्ल बाया ... मोर्चात मार खाणाऱ्या बारा तेरा वर्षाच्या पोरी ... येशी नि राशी. दारूचे माठ शोधून फोडणारा आमचा जथ्या.

केवढा प्रचंड विश्वास वाटतो त्यांना संघटनेबद्दल.

‘ ममी जाम वैतागते माझ्यावर. पण मला अलीकडे सुंदर साड्या नेसाव्यात, कुणालातरी झुलवावं, भुलवावं असं वाटतच नाही. ’

– संध्या अरुणाला सांगत असते.

मिलिंद अरुणासंध्याशी गप्पा मारत उभा राहतो. पण त्याचे कान मात्र आहेत गिरिधर नि विजाच्या बोलण्याकडे.

‘ ... अरे, ही बड्यांची पोरं केवळ फॅशन म्हणून येतात आपल्याकडे. हाही एक प्रतिष्ठा मिळविण्याचा मार्ग म्हणून. रिअली आय हेट देम. त्यांचा पैसा नाकारायचा नाही, पण पैशासाठी त्यांना फार महत्त्वही द्यायचं नाही. अरे, ही पोरं

उद्या बापाविरुद्ध राहणार आहेत उभी? अरे, ही धमक त्यांच्यात नाही.

लेट हिम कम ... पण फार विश्वास टाकून, फार कौतुक करू नकोस."

विजाचं बोलणं त्याला अस्फुट ऐकू येत असतं. विजाच्या मघाच्या हसण्याचाही त्याला वीट येतो. तो जायला निघतो.

घरीही जावंसं वाटत नाही. मनावर ढगळ बुरशीचा दाट थर चढलाय. वाटतं, जगणं म्हणजे एक तुफान ... भंकस ... न टाळता येणारी.

दगडी अंधार गळ्यापर्यंत दाटतोय. श्वास घुसमटताहेत. अंधार फोडून आवेगानं बाहेर येण्यासाठी त्यांचं मन तडफडतं. तो मानेला ताण देऊन कडकड हाडं मोडतो नि छाती भरून श्वास घेत झपझप चालू लागतो.

समोर टेलिफोन बूथ. तो आत शिरतो.

'हॅलो, मी मिलिंद अरविंद सोनाळकर. पेपर अँड पल्पच्या जनरल मॅनेजरचा मुलगा. माझ्या वडिलांचे आठ बँकांत अकाउंटस् आहेत. नि तीन बँकांत लॉकर्स. दहा दिवसापूर्वी बाबा गोव्याहून आले. येताना खूपशी बिस्किटं आणलीत. ती आता या क्षणी ममीच्या रूममधल्या तळघराच्या चोरकप्प्यात मिळतील. माझ्या बाबांना वडिलार्जित ईस्टेट काहीही नव्हती.'

तो बाहेर येऊन कपाळावरचा घाम पुसून टाकतो.

नटराज समोरच्या फूटपाथवरच्या फ्रूटज्यूस सेंटरमधून

ऑरेंज ज्यूस घेऊन कट्ट्यावर येऊन बसतो. आरामात ज्यूस पीत.

ऑरेंज ज्यूस ... मग पाईनॲपल ... मग हापूस – स्पेशल. नंतर मिक्स ...

घड्याळात नऊ वाजलेत. म्हणजे घरी नक्की रेडचा गोंधळ सुरू असणार. भेदरलेली ममी. पपांचा लाजिरवाणा चेहरा. आपल्याच पोरानं सारं सांगितलं हे कळल्यावर आतून पेटलेले. पण वरवर मिळमिळीत, गिळगिळीत चेहऱ्याने बसलेले पपा. ...

कुजकट हसणारे शेजारी. बंगलेवाल्या बाया नि आतून धास्तावलेले पण स्वत:च्या सचोटीच्या स्टोऱ्या पोराबाळांना ऐकवणारे त्यांचे नवरे ...

त्याला वाटतं, विजाला नाहीतर गिरिधरला बरोबर घेऊनच घरी जावं. तो ऑफिसच्या दिशेनं वळतोही. पुन्हा वाटतं, उद्या पेपरमध्येच वाचू दे.

'बापाविरुद्ध जाण्याची आहे यांच्यात धमक ?' विजाचे शब्द आठवतात. तो मनाशीच खुशीत हसतो नि घराकडे वळतो.

सगळीकडे सामसूम.

बहुधा सगळं पार पडलेलं दिसतंय.

तो फाटक उघडतो. समोरून एक माणूस नि डॅडी हसत पायऱ्या उतरत बाहेर येतात. बरोबर ममीही.

'हे आले आमचे चिरंजीव.'

'अहो आपल्या गोजिरवाण्या पोरांना मुद्दाम टारजेट बनवून बिघडवलं जातं नि मग त्यांच्याकडून ही कृत्यं करवून घेतली जातात.'

'यू डोन्ट ब्लेम हिम ! '

त्यांचं मन जपा. अरे, कोवळं वय हे !

मी मुद्दामच कानावर घालायला आलो. ओ. के. मी त्या पोरांना काहीही करून अडकवतोच. यू डोन्ट बॉदर.

... काही हलवाहलवी करायची तर करून टाका. नंतर त्रास नको.' तो कडक सुटातला गोरा माणूस निघून जातो.

'मिलिंद बेटा, किती उशीर. कुठं भटकत होतास ? किती वरीड होते मी ! ' मिलिंदचा हात धरून ममी त्याला आत नेतेय.

'मनोर. डोन्ट डिस्टर्ब हिम. लेट हिम हॅव रेस्ट. उद्या ना, मी काश्मीरची रिझर्व्हेशन्स करतो.'

'सुजाता नोटबुक्स'चा नानालाल केव्हाचा मागं लागलाय ट्रीपसाठी.'

'त्याला काही सांगू नकोस. बोलू नकोस.' डॅडी ममीला बजावताहेत.

मिलिंद मुकाट्यानं ममी मागं जातोय.

काही बोलण्यासारखं नि सांगण्यासारखं उरलंच नाहीये.

* *

# वाढत्या सांजवेळे

फूटपाथच्या पलीकडे वर्तुळाकार हिरवळ रंगी-बेरंगी छत्र्यांच्या खाली बसून, लोक आरामात भेळपुरी खात आहेत. तिला मनस्वी इच्छा होते, भेळपुरी खावी. ती काही बोला-याच्या आत तो तिला म्हणतो,

‘ खायची भेळपुरी ? ’

ते दोघे लाल हिरव्या छत्रीखाली बसतात. संध्याकाळ दाटून आली आहे. भोवताली सळसळणारी गर्दी; लालहिरव्या दिव्यांच्या ठिपक्यांची उघडझाप; झगझगीत जरीनक्षीच्या फॉरिन नॉयलॉनमध्ये गुंडाळलेले चटकमटक चेहेरे; ... ... या साऱ्यांवर एक छाया दाटलेल्या संध्याकाळची. वायरच्या इवल्याशा बाजेवर ती बसते. तोही तिच्या शेजारी ऐसपैस बसतो. ती आपोआप चोरून बसते; भेळेची खमंग चव ओठा-वर रेंगाळते नि मग तीही जरा सैल होते; चवीने भेळ खाऊ लागते.

‘ हे काय सोन्याच्या बांगड्या नाही घातल्यास ? निदान मॅचिंग तरी घालायच्यास ? ’

पाण्याचा ग्लास टेबलावर ठेवणारा तिचा डावा हात अल्गद हातात घेत तो म्हणतो. ती चमकून त्याच्याकडे बघते. तो घाईघाईने सांगतो;

‘ हिने सांगितल्यात आणायला. तुझ्या पसंतीने घेऊ ’

तो मनोमन अस्वस्थ होतो. काहीसं अंतर राखून सावरून बसतो.

तिला वाईट वाटतं. वाटतं ... उगाच संशय घेतला आपण. दूरच्या गावी इतक्या ओळखीचं माणूस अचानक भेटलं की जवळीक वाटणार ... त्याच्या कोमेजल्या मनावर फुंकर घालावी म्हणून ती नव्या उत्साहाने बोलू लागते. ... प्रश्न विचारू लागते. तिच्या किल्बिलीनी तोही सुखावतो. सावरतो.

‘ ही दिल्लीची चाट. एकदम मस्त. खाही मिठ्ठी बघ तर... म्हणत तिच्या हातात पानांचा द्रोण तो कोंबतो. त्याची घाई पाहून तिलाही खुद्कन् हसू येतं. टप्पोरकळी टचकन् फुटावी तसं.

समोर पाळणा फिरतोय. आणि त्या पाळण्यातून वरखाली गरगरणारी माणसंही. आईस्क्रीमचा कोन चोखत झिंग येईस्तो गरगरत राहायचं. तो तिला आग्रह करतो. ती वरवर नको म्हणते.

‘ इतक्या दूर आल्यावर. लातुरातली धुळवट राप टाकून दे की ! ’ तो चक्क तिचा दंड घट्ट धरतो आणि चक्राकडे धावू लागतो.

दंवबिंदू डंवरून यावेत तसा कपाळावर घाम. रक्ता-रक्तातून विलक्षण थरथर. अवघा देह सतारीगत झणाणणारा.

तिला वाटतं त्याला ओरडून सांगावं, ... ' सोड हात ... नको ओढूस ओखटचा जाळ्यात. पण शब्द निःशब्द होतात. ती फिरतच राहते. चक्राच्या बरोबर.

चक्र फिरतंय. एकेका फेरीबरोबर गळून पडणारं एकेक ओझं ...

... दहा वर्ष कशी नि कुठे गेली कळलंच नाही. करकचून बांधल्यागत जीवन. लग्नानंतर मधुचंद्राला जाण्याचा हट्ट तिचाच. म्हणून तरीं महाबळेश्वरला जाता आलं. नंतर माहेरीं जाऊन निवांत होणंही कठीण. तो कोर्टकचेऱ्या आणि राजकारणात गुंतलेला. मुंबई–औरंगाबादच्या फेऱ्यांत अडकलेला. घरी एकटं बसून कंटाळा येतो म्हणून ती एम्. ए. ला बसली. आणि पहिली आली. मग राहूल. त्याच्या पाठोपाठ कुणाल. वर्षांनी लगेच यशोधरा. खरं तर यशू तिच्या मनाविरुद्ध आलेली. यशू चार महिन्यांची असताना कॉलेजात इतिहासाची जागा मोकळी झाली. मग सुरू झालं नोकरीचं रुटीन. फक्त रुटीन.

पहाटे पाचला उठायचं. खाणं, चहा आटोपून कॉलेजला पळायचं. बारा वाजता घरी आलं की जेवण. दुपारी वाचन. मग घरातली आवरसावर. शिवाय दिवसाचे दहा तास ' ट्रे सर्व्हिस '. त्याच्या राजकारणामुळे आणि वकिलीमुळे पाहुण्यांनी सदैव घर भरलेलं. संध्याकाळी जेवण. कधी मधी त्याच्या लहरींना दिलेली निर्जीव उत्तरं. तेही रुटीन.

भाजी कोणती करायची ? तेल मोहरी संपली का ? निमावर्न्सीचं बाळंतपण कुठे करायचं ? असल्या पाणचट

प्रश्नांशी झुंजण्यात सारी शक्तीं संपायची. कधी कधी वाटायचं चिंच मिठात घोळवताना ; माठात भरताना कशी लालचुटुक आणि तकतकीत असते. पण दिवस मागे पडतात नि ती पार काळी मिचूट होऊन जाते. आपणही तशाच ओशट झालो आहोत.

कॉलेजला असताना प्रत्येक पहाटेला गंध असायचा. नव्या उमलत्या बूच फुलांचा माथ्यावर आभाळ होतं स्वप्नांनी खंचलेलं. प्रा. ब्रोकरे प्लासीच्या लढाईचे परिणाम गंभीर चेहेऱ्यांनी सांगायचे तेव्हा, हिच्या वहीवर असायच्या कवितांच्या ओळी.

पदरात घेऊन जुईच्या कळचा
स्वप्न पहाटेसम,
थांबले आहे रे तुझ्या अंगणात ...

कशी कुणास ठाऊक पण ती उमाकांतच्या प्रेमात पडली होती. त्याचा सावळा रंग, धरधरीत नाक, ताठर हनुवटी ... धारदार बोचक नजर, दाट कुरळे केस, दणगट बांधा. कधी अग्नी ज्वालेसारखी झळाळणारी, कधी पाकळीसारखी मऊ बनणारी त्याची शब्दकला. त्या शब्दांच्या वेगात ती वाहायली होती. साऱ्या स्वप्नांची ओंजळ त्याच्यावर उधळून मोकळी झाली होती.

तो त्याच्या मार्गाने जातच होता. पण ती मात्र मुलं, संसार, परंपरा, रूढी या वेटोळ्यात अडकून मागे पडली होती. आपल्या मुलांपैकी एखादं कश्मीरच्या धुंद क्षणांची साक्ष

देणारं असावं हे एक लग्नापूर्वीचं झुळझुळीत स्वप्न. पण तीनही मुलं चक्क लातूरचीच.

यूथ सेमिनारचं बोलावणं आलं; नि तिला जाणवलं आपण तरुण आहोत. फक्त तीस वर्षाच्या.

आरशासमोर उभी राहायल्यावर तिला त्यातली 'काकू' बोचली होती. एक शेपटा; मानेवरच्या वळ्या; अंगभर साचलेला धुळवट राप. तिनं ठरवून टाकलं होतं दिल्लीचं आमंत्रण स्वीकरायचं ... सारी ओझी दूर फेकून द्यायची.

दिल्लीला निघण्याच्या आदली रात्र. तीन आठवडे ती दूर जाणार म्हणून केवढा व्याकूळ झाला होता उमाकान्त. संध्याकाळीच तीनही मुलांना घेऊन तिची आई सोलापूरला परतली होती. खूप दिवसांनी घरात उरले होते ती आणि तो. फक्त दोघे, मनमोकळ्या शृंगारातलं काठोकाठ सुख जाणवून, तो विलक्षण अस्वस्थ बनला होता. मनात कुठेतरी रुखरुखला होता.

इंद्रा नको ना जाऊस दिल्लीला. दहा वर्षे निसटून गेल्याची जीवघेणी हळहळ मनाला टोचतेय बघ. आपण इथेच मस्त मजेत राहू ... अं ? ... We will enjoy Second honey moon अं ? ... तिच्या कानांत तो गुणगुणला होता.

आणि ' दिल्ली आयो तो ए; उठणो कोई ? ' पलीकडची मारवाडीण आपल्या पोरीला उठवत होती. तिला त्यातलं ' दिल्ली आयो ' कळलं नि ती तट्टकन उठली. पहाटेचा गार गार वारा ... हिमालयावरून येणारा. निऑनच्या जांभळ्या उजेडात चमकणारे एकाकी रस्ते. क्षणभर पोटात गलबलून

आपल्याला उचलून

आलं. दूर फेकून द्यावं तसं वाटलं. आपल्या बावळटपणाचं नि वेडपणाचं तिचं तिलाच हसू आलं होतं.

अंगावरचा कोट नि हातातली आटोपशीर बॅग सावरीत तिने प्लॅटफॉर्मवर चुटकन् उडी मारली होती.

रिक्षा वेगाने धावत होती. पार्लमेंटहाऊस, राष्ट्रपतिभवन, साऊथ अॅवेन्यू, त्रीमूर्ती...रेशमासारखे मऊ मऊ रस्ते. पहाटेचा फिकाफिका उजेड; चौरस्त्याच्या मध्यावर दाटीवाटीने फुललेली फुलांची गर्दी, दुतर्फा हारीने उभी राहिलेली हिरवी झाडे ... साऱ्या वातावरणाला येणारा एक हलका टवटवीत बसंती गंध ! ! !

तिच्या खोलीतली पार्टनर अजून गाढ झोपेत होती. दार उघडत मिटल्या नजरेने तिने सलामी दिली होती.

'ओह्! गुडमॉर्निग. हॅव ए रेस्ट अॅण्ड रिलॅक्स. ओ के ! !'

शेवटच्या शब्दाला ती झोपलीही होती. इन्द्राला मनोमन जाणवलं होतं की आपण दिल्लीत आलो आहोत आणि तेही चाणक्यपुरी मधल्या एका बडचा इंटरनॅशनल यूथ हॉस्टेल-मध्ये.

काचेचा दरवाजा उघडून ती बाल्कनीत आली. समोर होते शांत रस्ते ... रस्त्यांच्या कडेकडेने झगमगणारे. निरनिराळ्या देशांच्या वकिलातींचे बोर्डस्. तनभर ... मनभर पसरली एक टवटवी ... न्हायल्यावर पसरते तशी. तीन मुलं. घर, नवरा, काळजी सारं दूर दूर राहिलं होतं. आता दिल्ली, ताज, मथुरा, अभ्यास, सेमिनार यांत आकंठ बुडून जायाचं होतं.

त्याच दिवशी सकाळचा ब्रेकफास्ट घेऊन ती बंगालीबाबू बरोबर बाहेर पडली. समीर सेनही सेमिनारसाठीच आला होता. दर महिन्याला त्याची दिल्लीला खेप असायची. दिल्ली दाखवायचे आश्वासन त्याने तिला दिलं होतं. मुक्तिसैन्यातल्या सैनिकांच्या मुलाखती घेण्यासाठी तो बांगला देशात जाऊन आला होता. त्याची बडबड ऐकताना पार्लमेंट हाऊस कधी आले ते कळले नाही. कुण्या खासदाराला भेटण्यासाठी तो आत गेला आणि गोलखांबांची दाट किनार असलेल्या त्या वर्तुळाकार भव्य वास्तूंची भव्यता निरखीत ती हिरवळीवर बसून राहिली.

'हॅलो, ... इंद्रा तू इथे कुठे ?'

मोहन तिच्या जवळ उभा होता. तीही क्षणभर अवाक् झाली होती. दूर दिल्लीत पहिल्याच दिवशी इतकं जवळचं माणूस भेटेल असं वाटलंच नव्हतं.

'यूथ लिडरशिप कॅंपसाठी आलेय मी. नि तू ?'

'ऑल इंडिया मेडिकल कॉन्फरन्स आहे सध्या इथे. नाहीतरी निलंग्याचा कंटाळा आला की मी थेट दिल्ली गाठत असतो. मुंबईच्या गजगजाटापेक्षा दिल्लीत कसं गार वाटतं.'

'एकटाच ?'

'दिल्लीत यायचं ते निलंग्याची प्रत्येक निशाणी पुसून', फक्त मनमुक्त जगण्यासाठी. मग ते दुकट्यांनी कशाला ? बरं काय काय पाहिलेस ?' विषय बदलत त्याने विचारले होते.

'आज तर आलेय. एक बंगाली स्टुडंट गाठलाय दिल्ली दाखविण्यासाठी.'

'तू म्हणशील तर येतो संध्याकाळी मी, कॅनॉटप्लेसला जाऊया.'

'ये की! नाही तरी इंग्लिशमधून बोलायचे म्हणजे प्राणसंकटच. येच.'

'तू म्हणत असशील तर सिमला – आगऱ्यालाही जाऊ. कंपनी हवी अशा ठिकाणी जायचं तर!' तो हसत म्हणाला होता.

'झालं! तीन पोरांना नि नवऱ्याला टाकून आलेय मी!' तिनेही उत्तर दिले होते.

गडद जांभळ्या फुलांची लक्ष्मीविष्णू टेरीवायल नेसून संध्याकाळी ती त्याची वाट बघत टेरेसवर उभी होती. हल्लकं फुल्ल बनून. टॅक्सीने एक वळण घेतले नि त्या सरशी ती त्याच्या अंगावर कलंडली होती. सेंटचा हुळहुळता दर्प. त्याक्षणी उमाकांतचे डोळे आठवले होते. भावुक आणि संथ. तिला वाटलं होतं का आठवावेत ते डोळे ... ती नजर? मोहन का परका होता? दर महिन्याला त्याची लातूरला खेप असायची. औषधं घ्यायला आला की दोनदोन दिवस मुक्काम ठोकायचा. ती स्वैपाकात गुंतलेली असायची. चहाच्या घुटक्यागणिक गप्पा रंगायच्या. पुण्या–मुंबईची ट्रिप, नव्या साड्या; शिनॉन की कायसं सिल्क; त्याचा सुंदर पोत. महाराजा ... ' सखाराम बाइंडर...गुड्डी...आचार्य-रजनीश सगळ्यांची हजेरी लागायची. ती नेहमी म्हणायची,

'मोहन भावजी तुम्ही असे रसिक नि तुमचं गाव धुळीन रापलेलं. करमतं काहो निलंग्यात?' तिने एम्. ए. व्हावं

म्हणून किती आग्रह करायचा तो. उमाकांतला नेहेमी जामायचा.

'उम्या लेका इंद्राला पार कोळशात आणि फोडणीत बुडवलंस तू. पुरे करा आता वाढता संसार. हवा लागू दे जरा तिला !'

... का कुणास ठाऊक. त्याचा होणारा स्पर्श तिला वेगळा वाटला होता. काहींसा आतुर ... उत्सुक. क्षणभर वाटलं होतं डोकं दुखण्याचं निमित्त सांगून केन्द्रावर परतावं. पण गाडया-गाडया भिंगोऱ्या खेळताना भोवळ येतेयसं वाटले, तरी गर-गरतच राहावेसे वाटते तशी ती त्याच्याबरोबर भारल्यागत पावलं टाकीत राहिली होती ...

.....................

'इन्द्रा डोळे उघड. चक्कर आली ?'

तिचं मस्तक त्याच्या खांद्यावर असतं. ती झडझडून जागी होते. बाजूला सरकते. त्याच्याकडे बघायचीही शरम वाटते. नकळत डोळे भरून येतात.

'इन्द्रा इतकी कशी तू खुळी ? एवढी एम. ए. झालीस पण निव्वळ मोगलाई छाप आहेस. तू त्या सुलोचना वाणीचा साधनेतला लेख वाचलास ? आपण इण्डियन सेक्सचा भलताच बाऊ करून घेतो. ... अरे वा ! दोराहाचा प्रिमियर आहे वाटतं आज ? आपण आता एम्योरिअममध्ये शॉपिंग करू. मग 'शुद्ध वेजिटेरियन' मध्ये श्रीखंड पुरीचे जेवण घेऊन माझ्या हॉटेलवर जाऊ. तिथून थेट थिएटरवर जाऊ. रिंग करून टाक तुझ्या केन्द्रावर. दोराहा, चेतना दस्तकच्या युगात वावरतेस. थोडी फ्री हो. कमॉन !' तिचा दंड धरून तो रस्ता पार करतो.

राजस्थान एम्पोरिअम. घुंगटात संकोचून वसलेल्या आदबशीर भावल्या; रंगीबेरंगी खडे, मणी; काचाच्या नक्षीच्या झगमगत्या चुडचा ! अरीवर्कनी चमचमणारी लाल चुनडी हातांत घेऊन तिथली तरुण विक्रेती अमेरिकन जोडप्याला सांगत असते,

... हा लाल रंग प्रीतीच्या बंधनाचा. विवाहाच्या वेळी हीच चुंदडी राजस्थानी वधू पेहेनते. पतिपत्नीचं नातं सदासदैव बांधून ठेवणारी, म्हणून हिचं नाव बंधन चुंदडी. बांधणी.

गुलबक्षी रंगावर मोहनरंगी पिवळे बुंदके बांधलेली शिनॉन तो तिच्या अंगावर उलगडून टाकतो.

' इन्द्रा तुला खुलतेय बघ '.

' न खुलायला काय झालं ? मला खरेदी मुळीच करायची नाही. फक्त यशूसाठी आरशांचा कुरता खरेदी करणारेय मी. माझ्या पर्सला परवडायची नाही साडी ! '

' तू कशाला चिंता करतेस ? तू फक्त सिलेक्ट कर. बाकी माझ्यावर सोड. ' असं म्हणत तो तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो. आणि साडी बांधायला लावतो.

तिच्या खांद्याला लगटून तो पायऱ्या उतरतो. वाढती संध्याकाळ. दाट होणारा, अस्वस्थ करणारा त्याचा स्पर्श. तुळशीत पुरलेली वेडी स्वप्नं जागी होतील अन् तुळशीचं पान नि पान जाळून जातील. १५० रुपयाची साडी, दहा रुपयाच्या चुडचा, सत्तर रुपायाचे नेपाळी खडयांचे टॉप्स... एका झटक्यात उमाकांतने तरी एवढा खर्च केला असता का ? एका तासात चारशे रुपयांची खरेदी शिवाय टॅक्सी, आइस्क्रीम,

शुद्ध वेजिटेरिअन मधलं म्हागडं जेवण...जवळ जवळ पाचशे रुपयांचा खर्च. फक्त एका संध्याकाळी आणि त्याच्या बदल्यात ?

हॉटेलवर चलण्याचा आग्रह, दोराहाच्या सेकंड शोची तिकटे आणि मग ... कदाचित् ? तिच्या डोळ्यांसमोर अंधार पसरतो. रेशमी फासात अडकलेल्या असहाय हरणीसारखं मन तडफडायला लागतं.

दृष्टीभर पसरलेली झगमगीत धुंद दिल्ली. वाढती संध्याकाळ. त्याचे लालस नि निर्धास्त डोळे; ऐसपैस वागणं. ती विलक्षण व्याकुळ होते. एकदम सावरते.

' एवढ सामान घेतलंस. पण ठेवायला बॅग पण नाही '

केरळा एम्पोरियममधून ते बास्केट खरेदी करतात. टॅक्सीत बसताना ती बास्केट काळजीपूर्वक दोघांच्या मध्ये ठेवते. तो वैतागतो नि ती बास्केट खाली आदळतो. ती खुदकन हंसते नि त्याला सांगते,

' आत्ताशी ७॥ तर वाजताहेत. मला केंन्द्रावर जाऊ दे. ठीक ९ ला येते मी. रात्रीची परवानगीही काढून येईन. शिवाय मॅचिंग ब्लाउझही घेऊन येते. आहे माझ्याजवळ. ही बॅग राहूदे तुझ्या रूमवर ... ' तिच्या लडिवाळ बोलण्याने सुखावतो.

' ओ के ! ओके !! ' करीत उतरतो.

केंन्द्रापुढच्या बागेतले नाजूक वळण घेऊन टॅक्सी पोर्च-मध्ये उभी राहते. ड्राईव्हरच्या हातावर पाच रुपयाची नोट

ठेवून मागे न पाहता ती धावतच पायऱ्या चढते आणि फोन-कडे धावते.

समोर सेमिनारचे सगळे प्रतिनिधी डार्यनिगहॉलमध्ये डिनर घेताहेत. समीर तिथून तिला हात करतो. ती पण हसून हात हलवते. रिसेप्शनिस्ट गीताचे गोड हसणं ... ठाकूरदाने दाराशी ठोकलेला सलाम ... तिला आपल्या माणसात आल्यागत वाटतं.

'हॅलो मोहन देशमुख ? हं मी इन्द्रा. कालच्या प्रवासाने डोकं एकदम चढले बघ. तेव्हा ... सॉरी हं. पुन्हा ? ... छे! छे! ! उद्यापासून सेमिनार सुरू. आता भेटू लातूरलाच...

ती फोन खाली ठवते आणि गळ्यातलं मंगळसूत्र पदरा-बाहेर काढीत डौलानं डिनर हॉलच्या पायऱ्या चढू लागते.

* *

## पहाटनाते

तो तिच्या ताटात आग्रहाचा फुलका टाकतो, आणि वेटरला कोफ्ताकरी तिच्या वाटीत वाढायला लावतो.

" अजि बस ! मैं मोटी हो जाऊँगी, तो मेरे पतिराज और रूठ जाअेंगे ... "

" छे ... छे. खाताना फक्त खाण्याची मजा लुटायची. नुस्तं तृप्त व्हायचं. मन भरेस्तो खा. आणि तुला तुझा हा बांधाच छान शोभतो. कोण म्हणतं तुला जाडी ? "

असं म्हणत अेक टम्म फुगलेला रसगुल्ला तो तिच्या वाटीत टाकतो. ती चवीने खात रहाते.

... कुणीतरी नितांत प्रेमानं आपल्याला वाढावं; आपण नको नको म्हणत खाव. केवढं सुख असतं त्यात! ते सुख तिच्या चेहेऱ्यावर उमटलेलं. त्यावर अनोख्या संकोचाची लवथवती लहर ...

त्याला तिच्या चेहेऱ्यावरची तृप्ती जाणवते. तो विचारतो " खुश हो ? "

" आमी तो बहोत खुश आछीन ... ॲम आय करेक्ट ?"

तो खळाळून हसतो नि म्हणतो,

" हां हां. तू तर चार दिवसात बंगालीण वनलीस."

' जनपथ ' मधून बाहेर पडताना मन कसं फुलारून येतं. न कळत ती रबिन्ला लगटून चालू लागते. संध्याकाळची निहार वेळ. पावलात कोवळं वारं भरलेलं. ती दोघं राष्ट्रपतीभवनापाशी येतात. राष्ट्रपतीभवनासमोरच्या हिरवळीवर कारंजाचे तुषार झिरमिरताहेत आणि रंगीबेरंगी उजेडाचे कवडसेही. दिवस-भराच्या उन्हाने कोळपून गेलेली हिरवळ कशी ताजीतवानी झालीय. हवेतून झिरपणारा गार गंध ... हलक्या गुलाबी रंगाच्या फुलांचे गच्च ताटवे ...; समोर सरळ रेषेत जाणारा रुंद रस्ता ; ... निऑनच्या उजेडात चकमकणारा. दूरवरच्या कमानीवर तेजाळणारी वीरस्मृती ज्योत.

" यहाँ थोडी देर ठेहेरेंगे ? ... " तो विचारतो.

" माझ्या नं अगदी हेच मनात आलं होतं. कसं ओळखलंत " ती विचारते.

तो मोकळं मोकळं हसतो आणि आदबीने आपला रुमाल तिच्यासाठी अंथरतो. मग बराच वेळ मुकी स्तब्धता.

तिला वाटतं, ही अनोखी शाम... हे दिवस संपूच नयेत. वठलेल्या पारिजातावर खूप खूप दिवसांनी बहर यावा तशी ती; अगदी आतून फुलीफुलून येणारी.

वर्दळ शांत झालेली आहे. तिला वाटतं, या ओल्याशार हिरवाळीवर खुशाल अंग झोकून द्यावं आणि डोळे भिजेस्तो गावं...

'मीरा आपने आश्वासन दिया था मराठी गाना गानेका याद है ना? गाओना' त्याचा आग्रह.

'मराठी समझ सकोगे?' ती मिष्किलपणे विचारते.

'आरी, तू बंगालन बन गयी, मुझे भी तो मराठी समझनेकी कोशिश करनी पडेगी... गाओ. चलो. एक...दो...'

तीन म्हणायच्या आत सूर उमटतात.

'रिमझिम पडती श्रावणधारा

धरतीच्या कलशात

प्रियाविण उदास वाटे रात...

आरस्पानी धारा अंचावरून सांडावी तसा आवाज. नितळ आणि आर्त. कारंजाचे थेंब आणि गारवा अंगागाला झोंबतो. तसेच सूरही. त्याला वाटलं नव्हतं इतकी सुंदर ती गाते. कधीतरी ती थांबते. आपले मिटलेले डोळे तसेच मिटून तो फर्मावितो;

'और एक! प्लीज...मीरा, और एक...'

'हिंदी म्हणूऽ' ती विचारते.

'कुछभी गाओ! गाओ ना!' बस तुम गाओं और मैं सुनता रहूं!

'ओऽ सजनाऽ

बरखाँ बहार आयी ...'

मन मागेमागे धावतं. महाबळेश्वरची पहिली रात्र. अनंतनं गाणं म्हणण्याचा आग्रह केला होता. त्याचं मांडीवर मस्तक. ती खूपशी भेदरलेली आणि संकोचलेली. थरथरत्या, अस्पष्ट

आवाजात तिने गाणे म्हटले होते; ओऽ सजना... त्या सुरांनी ती दर्वळून गेली होती. चार दिवसांपूर्वी तिला अनोळखी असणारा अनंत तिचा 'सजन' बनला होता. गाणं संपण्या-पूर्वीच अपार भारून तिने त्याच्या बाहूत स्वत:ला झोकून दिले होते. मग नंतरची प्रत्येक रात्र हलक्या सुरांनी रंगायची. मग नितीनचा जन्म. मग केव्हातरी, हळूहळू अंधूक होत जाणारे सूर पार विरून गेले होते. उरले होते रुटीन. वयाच्या आठव्या वर्षापासून सोळा वर्षं आपण नुस्त्या गात नि गातच होतो ते ती पार विसरून गेली होती...

गातागाताच तिचे डोळे भरून येतात; स्वर दाटून येतात. ती मधेच थांबते.

रबिन दचकून डोळे उघडतो. ओंजळीत तोंड लपवून ती हुंदके देत असते. उरातला उमाळा श्वासाश्वासात मावत नाही. सारा देह गदगदून जातो. क्षणभर त्यालाही सुचेनासे होते.

'मीरा....मीरा...'

त्याचा मऊ आवाज. तिला आणखीनच भरून येतं. तिचा माथा हळूवारपणे वर उचलीत, तिच्या खांद्यावर थोपटीत तो हळूवारपणे म्हणतो,

'मीरा, किसीकी याद आयीऽ... पगली. तू तर चार दिवसांनी पोचशील तुझ्या घरी.'

आपण त्याच्यासमोर रडलो या जाणीवेने ती मनोमन शरमिंदी होते.

'सॉरी रबिन्. मी वेड्यासारखीच वागले. असं रडायला नको होतं.... फार वर्षांनी गायले आज...'

तो स्तब्धच राहातो.

ते यूथ होस्टेलपाशी येतात तेव्हा नउ वाजून गेलेले असतात. बाहेरच्या अर्धवर्तुळाकार हिरवळीत आंध्राचा सुब्बाराव लोळत असतो. तो हात करतो रबिन् तिकडे वळतो. ती थेट खोलीत येते.

...हळूहळू अनंतने संसाराबाहेरचे विश्व उभे केले होते. त्याचे मित्र...मैत्रिणी...नॉनव्हेज पार्ट्या. कंपनीच्या कामासाठी भारतभर भटकावे लागायचं. करमत नाही म्हणून ती औरंगाबादच्या यूथ होस्टेलचे काम बघायची. वेरूळची लेणी बघण्यासाठी देशविदेशीचे तरुण येत. वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय यूथ ऑर्गनायझेशन्सचे तरुण येत. त्यांच्या राहण्याची...प्रवासाची व्यवस्था करण्यात ती गुंतून जाई. दिवसातले संध्याकाळचे २।३ तास तेवढेच कटत.

तिला वाटायचं आपण केलेल्या पदार्थाचं अनंतनं कौतुक करावं... घर नेटकं ठेवून आपण यूथ होस्टेलचं काम बघतो त्याचा अभिमान बाळगावा. पण तसं घडायचंच नाही. हिने ईडली केली तर हा म्हणायचा,

'माझ्या नावावर आपल्या जिभेचे चोजले पुरवू नका बाईसाहेब. आपला घेर आरशात बघा एकदा. ती मिसेस दर्याणी बघ. तीन पोरांची आई झाली तरी कसा फॉर्म मेंटेन केलाय. अंगभर कपडे घातले तरी पुरुष घायाळ होतो. तू एका पोरात बरणी होणारेस...'

मग सगळा उत्साह मावळून जायचा.

'...मिसेस शहा हेअर स्टाईल खूप सुंदर करते...मिस कुंदा देशमुखचे डोळे इतके काळेभोर नि फुलपाखरी आहेत. ...तिची सुईसारखी धारदार नजर अशी टोचते की कलिजा खल्लास होतो...आज पार्टीच्या वेळी आमच्या बॉसची बायको साडी इतकी झ्याक नेसली होती. तुझं ते काळं नीटेड नॉयलॉन आहे ना जांभळ्या फुलांचंऽ तसलीच. साडीसुद्धा नेसता यायला हवी. बहुतेक बायका साडी गुंडाळतात ... ' हे असलं नेहमी ऐकावं लागे.

यूथ होस्टेल, घर आणि नितीन यांच्यात ती स्वत:ला गुंतवून घेई. सुंदर दिसावं... तरतरीत हसावं...मुलायम साडी रेखून नेसावी...गजरा माळावा...त्याची वाट पहावी...तनमन फुलारून त्याच्याजवळ जावं, असं वाटायचंच नाही. पतीपत्नीच्या शृंगारातला उरलेला व्यवहार तिला विलक्षण किळसवाणा वाटायचा. मग पुरुषाच्या स्पर्शाशिवाय आपण जगू शकतो असा विश्वास ती गोंजारीत बसायची. अनंतला दूर ठेवायची.

'... एखाद्या स्त्रीला सुंदर म्हटलं म्हणून स्वत:च्या पत्नीवरचं प्रेम कमी होत असतं होय? तू उगाच धुमसतेस. अजूनही घरच्या ओढीनं आणि तुझ्या ओढीनं मी इथे थांबलो आहे. जेव्हा ही ओढ तुटून जाईल तेव्हा तुला सांगून दुसरीच्या दारात जाईन. चोरून नाही. तू मला हवी आहेस...'

कधी कधी अनंत उद्वेगाने सांगत राही. पण तरीही तिच्या मनातला पीळ सुटला नव्हता.

'पाठीचे टायर्स उघडे टाकून हिंडू नकोस बुवा' असलं तो

बोलतच राही. एकत्र हिंडावंफिरावं असं कधी वाटायचंच नाही.

ती संसार करायची. कोरडेपणानं! बंगला, सोफा, गाडी, फ्रीज...तशीच तीही. कधी कधी वाटायचं कुठे हरवली आपली उमेद? शेंदराचे जाड राप दिवसेन् दिवस साठत जावेत आणि मूर्तीची सारी गोंडस वळणे लिपून जावीत तशी ती. हरवलेली!

...शेजारी कलकत्त्याची मिसेस् रॉय आपल्या मुलासाठी नि नवऱ्यासाठी घेतलेल्या वस्तू मद्रासच्या मिनीला दाखवते आहे. मिनीही लाजत लाजत तिच्या 'फॅन' साठी घेतलेला नाईट गाऊन दाखवते. मीरा दार उघडून बाहेर येते. आवेगाने तीनही जिने उतरून लॉनवर येते. हॉस्टेलच्या सगळ्या खिडक्या अंधारल्या आहेत. एखादीच जागी.

...उद्या परतायचं. नितीनसाठी काही तरी घ्यायला हवं. अनंतसाठीही.

रबिन् तिच्या समोर केव्हा येऊन बसतो ते कळत नाही.

'मीरा...' त्याच्या ओलसर हाकेने ती विलक्षण व्याकुळ होते.

'रबिन्. रबिन् मला पत्र पाठवाल?' बोलताना दोन थेंब पापणीच्या जाळीत अडकतात.

गेले पंधरा दिवस. किती सुहाने!

आली त्या दिवशी दिल्लीतल्या रुख्याफिक्या थाटाला विचकून ती एकटीच बाहेरच्या लॉनवर बसली होती. हरवून.

'क्या मैं यहां बैठ सकता हूं?'

तिने वर पाहिले तर एक बंगालीबाबू उभा.

शुभ्र धोतराचा सोगा झब्ब्याच्या खिशात कोंबत ओठांचा चंबू करीत बोलणारा. सावळासा रंग, बोचक नजर आणि धारदार नाक. रॉबिन् चौधुरी. तो कलकत्त्याच्या यूथ होस्टेलचा सेक्रेटरी होता. सेमिनारसाठी आलेला. ती काही बोलण्यापूर्वीच तो खाली बसला होता, ऐसपैस. नि तसाच गप्पाही मारल्या होत्या ऐसपैस.

टिळक, टागोर. अॅना तर्खडकर, पगला घोडा नि एवं इंद्रजीत, नक्सलाईट, बांगला देशचें युद्ध...कितीतरी विषय गप्पात रंगून गेले होते. हरवलेला सूर अचानक गवसावा तशी तीही बडबडली होती. मुक्तपणे.

बंगाली रंगभूमी इतकीच मराठी रंगभूमीही स्वयंभू, समृद्ध आणि प्रायोगिक आहे हे तिने भांडून पटवून दिले होते. मतकरींची प्रेमकहाणी...सुलतान...गार्बो...वेकेट कितीतरी जणांच्या साक्षी काढल्या होत्या.

संध्याकाळचा कार्यक्रम मग आपोआपच ठरला. चाणक्य-पुरीतल्या, वृक्षांनी झाकल्या वाटांनी पायतळीची पानंफुलं चुरत दूरदूर भटकायचं. निरनिराळ्या अेम्बसींच्या दारांशी घुट-मळायचं आणि अंधार होअिस्तो, नि इवल्याइवल्या कारंजाच्या काठांशी पाण्यात पाय सोडून बडबडत चिवचिवत–राहायचं.

'शंकर'ची 'चौरंगी' वाचल्यावर ती कशी अस्वस्थ झाली होती; पण 'अेपार बांगला, ओपार बांगलांतल्या त्याच्या 'बंगाली' शिष्टपणाचा कसा राग आला हे ती त्याला चिडवत सांगायची. मग तो धमाल भांडायचा. बाँगला देशात त्याचे

आजोळ. तिथल्या नद्यांचे...भाताचे वर्णन करताना त्याचा चेहेरा फुलून जायचा. रॉबिन्द्रनाथ आणि बर्मनदा जणू त्याच्या घराअंगणातलेच असायचे.

किती विषय नि किती शब्द. त्याने कधी तिच्या घरा-दाराविषयी विचारले नाही. तिलाही कधी त्याला हे विचार-ण्याची आठवण झाली नाही.

प्रत्येक दिवस कसा तरतरीत! दिवसभर सेमिनार. त्यातल्या चर्चा. नंतरची संध्याकाळ अशी अनोखी. खळाळत्या मेघानेसारखी! सहा वाजता ती नकळत त्याची वाट पाहात पायऱ्यांवर उभी राही. आणि ती रेंगाळताना दिसली की तोही तिथे येई आणि म्हणे.

'चलने काऽ'

...दोन दिवसांनी पुन्हा सुरू होईल रुटीन. धुमसणं... वैताग...बेचव प्रेम. ओंजळीत जपून ठेवलेले क्षण निसटून जावेत तशी ती व्याकुळते...

'रबिन पाठवशील ना मला पत्र'

... कातर आवाजात ती त्याला विचारते.

लहान मुलाची खोटीखोटी समजूत घालताना हसतात तसं तो हसतो आणि एकदम काहीसा गंभीर होतो.

'...तुझ्या निरागस, कोवळ्या स्नेहानं मनावरची सारी जळमटं निघून गेली आहेत. मन कसं निर्मळ झालंय. तुझ्या सहवासात वाहून जाताना, प्रेयसी, पत्नी, बहीण या साऱ्या व्यवहारी नात्यापलीकडचा, आगळा स्नेहतंतू तुझ्यामाझ्यात निर्माण झाल्याची, विलक्षण आर्त जाणीव मला क्षणोक्षणी

व्हायची. त्याची झिंग...धुंदी काही अनोखी होती मीरा. तुला नाही असं जाणवत? जीवनातला राप; उबग सारं पार गळून गेलं आहे. तनभर, मनभर पसरली आहे कार्तिकातल्या सुस्नात पहाटेसारखी नखशिखान्त टवटवी. ती टवटवी घेऊन उरलेला संसार नितान्त तृप्तीनं करणार आहे मी. पत्र, मग जोडावी लागणारी 'भाभी' 'भैय्या'ची व्यवहारी नाती... छी! छी! या साऱ्यामुळे या नात्यांची वकुळनक्षी विस्कटून जाईल...

ही ओळख आता इथेच बुझवून टाकायची. मनाच्या खोल-खोल तळाशी हा स्वप्न–गंध जपून ठेवायचा.

... ही उदासी...मनातला धूर दूर फेकून द्यायचा. नव्या उमेदीनं जीवनात झोकून द्यायचं हं.

'... मीरा, बी अ गुड गर्ल.'

तिच्या खांद्याला अपार स्नेहानं थोपटीत राविन् तिला उठायला लावतो. ती त्याच्याकडे बघते अन् खुद्कन् हसते. रंगीबेरंगी चिटाच्या घेरदार झग्यासारखी. आणि नाचऱ्या पावलांनी खोलीत येते.

...मिनीचं सामान तिच्या बॅगमध्ये मावत नाहीये. सासरी जाणाऱ्या पोरीची ट्रंक आई भरून देते तशी मिसेस् रॉय मिनीचं सामान भरतेय. मिसेस रॉयच्या गळ्यात हात टाकत मीरा सांगते,

'रॉय तुला यायला हवं हं उद्या माझ्याबरोबर! माझी खरेदी तुझ्याच चॉईसने करणार आहे मी. मला तुझी कायमची आठवण राहील म्हणजे.

'...कुणास ठाऊक पुन्हा कधी भेट...' ती उत्साहाने बोलत राहाते खरी पण तरीही शेवटचे शब्द तिच्या घशात दाटून येतात.

* *

# तुझियामाझ्यामध्ये पहाटच झाली सेतू

सनईचे घरंगळते सूर.

दगडी भिंतीवरून झेपावणाऱ्या बोगनवेलीच्या बटबटीत झुबक्यासारखे. रंगीत, तरीही निर्विकार. त्या सुरांसारखीच तीही. ती त्याच्या शेजारी बसलीय. हातात आईस्क्रीम प्लेट. चमचा– चमचा चाटत बसताना वेळ जरा बरा जातो. एरवी जिकडे तिकडे उडताहेत कारंजी, तेलकट नि ओशट शब्दांची.

'... रोशन इज लकी ... नवरा रीअली फक्कड हं ! '

'देसाईसाहेब, जावई झकास मिळवलात '

'मिसेस् देसाई, रोशा इतकी गोड दिसतेय. पोतंभर मिरच्या ओवाळून टाका तिच्यावरून. '

'रोशन, नवरा क्यू ऽ ऽ ट हं ! पण त्याच्या टोकदार मिशा सांभाळ बाई ! '

या शब्दांच्या पाठीमागे आणखीनही खूपसे शब्द. ध्वनि-विहीन. मनाच्या कंसातले.

( अगदी बेत्ताचाय नाही जावई ? देसाई दर दोन वर्षांनी

स्टेटस्‌ला जातात. नि रोशाचा नवरा इथेच एम. एस्‌. झालाय-शी ! )

( नुसताच स्मार्ट नि गोमटा. घरी तर काहीसुद्धा नाही म्हणे. )

( बाकी रोशानं आई–बापांनी दिलेला नवरा पत्करलान्‌, हे काय कमी ? )

वगैरे वगैरे ...

पपा डॉ. संचेतींना घेऊन डायस जवळ येताहेत.

' मीट माय डॉटर मिसेस्‌ रोशन देसाई. ओ. नो. सॉरी मिसेस शिर्के ... मिसेस रोशन अजित शिर्के ... हे डॉ. अजित शिर्के. '

पपा बोलताना नको तिथे अडखळलेले असतात. ते अड-खळणं तिला पुनः पुन्हा आठवावंसं वाटतं. मनाला छान वाटतं.

तो शेजारी सावरून बसलाय.

तिला त्याची दया येते. बिच्चारा ! केव्हाचा एकटा एकटा बसलाय अन्‌ तेही अवघडून.

' बोअर झालात ? सुटात उकडत असेल नाही ? '

तो दचकून तिच्याकडे पाहतो.

ती खूप गोड दिसतेय.

' अं हं. आज बोअर होऊन कसं चालेल ? '

तो खुलून बोलतो नि जरा ऐसपैस बसतो.

त्याची किंचित्‌ लालस नजर. ती एका एकी अंग चोरून

घेते. तिचं अंग चोरणं त्याच्याही लक्षात आलं असावं. तो पुन्हा अवघडून बसतो.

नि मग पुन्हा दोघेही चमचा... चमचा आईस्क्रीम चाटीत बसतात.

○ ○ ○

आता हॉलमधली गर्दी विरळ झालेली. रिसेप्शन मूड संपलेला आहे. ती मैत्रिणींच्या घोळक्यात. तोही मित्रांच्यात जाऊन बसलेला आहे. मग जेवणाची पिठलं– भाताची पंगत. पुन्हा शेजारी तो नवखासा तरुण. जेवताजेवता हलक्या आवाजात ती त्याला बजावते–

' सगळ्यांच्या देखत खोलीत येण्याचा फार्स मला पसंत नाही. अन्टॉलरेबल फॉर मी ... ॲटलीस्ट ! उद्या सकाळी माथेरानला निघायचं आहेच ... '

तिच्या शब्दांचे ताठपण त्याला जाणवते. तो मंदसा हसतो, त्याचे दात चिमणे चिमणे आहेत. मध्ये हलक्याशा फटी. तपकिरी डोळे. निवळलेल्या पाण्यासारखे संथ नि शांत. या क्षणी तिला त्याचे डोळे आवडतात. पण डोळ्यांबरोबर थोडंच आयुष्य काढायचंय ?

' रोशन. तिसऱ्या मजल्यावरची सोळा नंबरची रूम बुक केलीय्. तुला सोडायला येतो आम्ही... '

मैत्रिणींना बहुधा माँनी पाठवलं असावं.

' आज खूप गप्पा मारूयात आपण इथेच, तुमच्याजवळ झोपते बाई मी. कुणास ठाऊक पुन्हा कधी असं मनमुक्त जीवन मिळेल की नाही... ' तिचा हट्ट.

तो सोळा नंबरमध्ये एकटाच. तिला मैत्रिणींशी गप्पा मारण्यातही इंटरेस्ट येत नाही. कसली तरी अनामिक भीती मनातून झिरपत राहते. ती डोळे मिटून गप्प पडून राहते.

'रोशा थकलीय. मालव बाई दिवा. पडलं पार एकदाचं लग्नं.'

मग काळाभोर अंधार. वर मिणमिणता जांभळा दिवा.

आज माँ नि पपांना शांत झोप लागली असेल.

० ० ०

रोशन : एक अवघड प्रॉब्लेम.

रोशनः बेअब्रूच्या शक्यतेची टांगती तलवार.

बापाच्या डनलॉप स्टेटसवर केव्हाही कोसळू पाहणारी !

रोशन देसाई : धगधगत्या अग्निफुलांचा रेशमी बहर. वर्गातला सोहन अगरवाल. त्याच्याबरोबर भटकायला आवडायचं. खूप इंटलिजंट नि मुख्य म्हणजे पोरींसमोर लाळ घोटत न बोलणारा. तपकिरी गाभुळी नजर रोखीत तो बोलायला लागला की क्षणभर श्वास धकधकायचा. कधी कधी बाहीचं बटण चावीत वेड्यासारखा निःशब्द बसून राहायचा. मग रोशा खट्याळपणे म्हणायची, 'चल बाबा रूपालीत तुला खाऊ घालते. बटणाला का ताप देतोस ?'

... यूथ सेंटरचा सतीश धवन. तुफान अॅग्रेसिव्ह. विचार करायला वेळच द्यायचा नाही. नेहमी कोणती ना कोणती इन्विटेशन्स घेऊन हा हजर असायचा- रोशन जॉईंट सेक्रेटरी म्हणजे जायलाच हवं.

‘ रोशा, ती ब्लू एलिफंटा पँट नि नेव्ही ब्लू झब्बा घाल. मी पण ब्लू चेक जर्सी घालतो. ’ असला आगाऊपणाही तो करी. पण कंपनी म्हणून बरा. शिवाय खूप हार्डवर्कर. पण ...

मनाच्या खोलात तसा कुणी शिरलाच नाही, ज्याच्यावर अवघं आभाळ उधळून मोकळं व्हावं.

सतीशची लाल स्कूटर दारात उभी राहिली की पपा अस्वस्थ व्हायचे. एक दिवस त्यांनी तिला बजावून सांगितलं,

‘ तू नाटकात काम कर – भन्नाट ड्रायव्हिंग कर. थोडी-फार पोरांबरोबर फीरही. लाईफ एंजॉय करायला मी अटकाव करणार नाही. पण देशमुखी रक्ताचा माझा अभिमान ... तुला माहिताय. तू एकुलती एक मुलगी आहेस माझी. कोणत्याही परजातीच्या मुलाशी तू लग्न केलेलं क्षणभरही खपवून घेणार नाही मी...मला वाद नकोय. ’

तरीही तिने आवाज पुढे रेटला होता.

‘ तुमचा माझ्यावर विश्वास नसेल तर खुशाल शिक्षण बंद करून टाका. मी मुलांबरोबर हिंडते पण नुसतं हिंडण्यासाठी नाही. कोणत्या ना कोणत्या कामाच्या संदर्भात. तुम्ही मला मोकळीक देता त्याचा दुरुपयोग होतोय, असं जर वाटत असेल तर माझ्या कुंवारपणाला तरी काय अर्थ आहे ? तुम्ही सांगाल त्याच्याशी ... तुमच्या जातीच्या कोणत्याही मुलाशी लग्न करायला तयार आहे मी. ’

बोलता बोलता तिचे डोळे डबडबून आले होते. पपांनी पुन्हा कधीही हा विषय काढला नव्हता. नवनवीन कपडे, नवीन पुस्तकं यांचा वर्षाव मात्र वाढला होता. दोन दिवसांतच ती

सावरली होती. पपांना हवं असलेलं वचन तिनं दिलेलं होतं. आता ती मुक्तपणे जगायला मोकळी होती.

कधी युवक बिरादरीचा नितीन, कधी बाल आनंद मेळाव्याचा योगेश शहा ... सतत ती कुणा ना कुणाबरोबर दिसायची. आन्तरभारती; क्लब; लिओ असोसिएशनच्या भन्नाट पाटर्या ... कधी सहली. तऱ्हेतऱ्हेच्या साड्या ... तऱ्हे-तऱ्हेचे दागिने ... असं तुफान वेगानं धावणारं लहरतं जीवन. तरीही ती निर्धाराने एका जागी पाय रोवून उभी असायची. एम. ए. पास झाली नि दुसऱ्याच दिवशी पपांनी एक जण घरी आणलान्. एक डॉक्टर. M. B. F. R. C. S. अशी लांबलचक डिग्री लावणारा. स्टेटसमध्ये सेटल होऊन तिथेच राहणारा. उंचापुरा नि नको तितका घारा. मॉंनी सांगितलेला साज घालून रोशा त्याच्यासमोर उभी राहिली.

'आयं हेट इंडियन कल्चर. किती भयान घाण आहे या देशात नि किती अंधश्रद्धा. तुम्हाला अमेरिकन फॅशन्स चार दिवसांत शिकवीन मी ... डोन्ट मिस् अंडरस्टॅंड मी. तसा मी अगदी कोरा आहे हं.' त्याचं ओघळणारं हसणं.

'मी माझ्या बायकोला साडी मुळीच नेसू देणार नाही. आय मीन तुम्हाला. युवर फॉर्म इज मोअर सुटेबल फॉर ...'

तिला त्याचं बोलणं भयानक असह्य झालं. अंगभर पांघ-रलेलं खानदानीपण फेकून ती तडाड् तडकली.

'डू यू बिलीव्ह इन कास्ट सिस्टीम? एखाद्या अमेरिकन 'मेड' बरोबर का केलं नाही लग्न? एका भारतीय पोरीचा छळवाद कुणासाठी मांडणार तुम्ही? आईबापांसाठी?'

मग पपांची धुसफूस. पपांच्या स्टेटसला शोभेसा खानदानी मुलगा नाकारल्याचा डंख. नंतर पुन्हा दुसरा मुलगा. हा अँबेसेडर मागणारा. त्याची मागणी ऐकून ती मनोमन तडफडली.

'पपा, केवळ तुम्हाला वचन दिलंय म्हणून जातीतला मुलगा पत्करीन मी. पण जीवनाविषयीच्या माझ्याही काही कल्पना आहेत, त्यांना मुरड घालणं परवडणारं नाही मला. हुंडा घेणारा मुलगा नकोय मला. लग्नही रजिस्टर व्हायला हवं. स्टेटस्चे घोळदार फुगे माझ्या मनात नाहीत. गरीब पण शिकलेला, स्वावलंबी नवरा चालेल मला.'

त्यानंतर पपांशी बोलणं खुंटलं होतं. माँ बोलायचा प्रयत्न करायची. माँ निव्वळ बाहुली. तिची कधी कधी कीव यायची नि कधी खूप रागही.

आठ दिवसांपूर्वी हा डॉक्टर सांगून आला. हुंडा न मागणारा. रोशननं त्याला पुसटसं पाहिलंय. तो कोण असेल, कसा असेल, याचा विचारच करायचा नाही, असं ठरवलं आहे. बळी जाताना निर्विकार मनानं जायचं. मरण आलं की चांगदेव म्हणे आत्मा ब्रह्मांडाच्या खुंटीला टांगून ठेवायचा. मनही तसंच दूर टांगता येतं. मग उरतात शरीराचे भोग.

o o o

माँनी सामान भरून ठेवलंय. ती त्यातल्या खूपशा साड्या उचकटून वाहेर काढून टाकते. चार सहा हलक्या–फुलक्या साड्या छोट्याशा बॅगमध्ये भरून बाहेरच्या हॉलमध्ये येते.

पपा टाईम्स वाचताहेत. तोंडात चिरूट. चिरुटाच्या वर

चढणाऱ्या धुरांच्या रेषा. समोर त्यांचा जावई अवघडून बसलाय. पपांचा चेहरा...मन उघडच्या पेपरनी झाकलेलं. घनघोर पावसात भिजलेलं चिमणं पिल्लू वळचणीच्या टोकाशी घाबरंघुबरं बसावं तसा तो. तिचा नवरा. अजित शिर्के. त्याच्याही हातात कुठलंसं मासिक, त्याची नजर तिच्यावर पडते. तो अंधुकसा हसतो. तीही हसते.

'चहा घेणार थोडा? दहीभात खाऊन निघू यां. साडे-नऊच्या एक्सप्रेसचं रिझर्वेशन आहे. गेट रेडी.'

तिचा आवाज ऐकून पपा वर्तमानपत्र दूर करतात.

'अरे तुम्ही लोक आज माथेरानला पळणार नाही का? ओ. के. ओके! बाबूला म्हणावं गाडी काढ बाहेर आणि कालचे हार चढव म्हणावं तिच्यावर.'

बोलता बोलता खिशातून पाकीट काढीत त्यातल्या पाच हिरव्या नोटा पपा टेबलावर ठेवतात.

'रोशा बेटा, एन्जॉय करा. हे दिवस पुन्हा कधीच हाती लागत नाहीत. खूप मजा करा. खूप...!! बी हॅपी–माय गर्ल.'

बहुधा पपांचा आवाज हल्लक झाला असावा.

तिला त्या नोटा खुपतात.

'सॉरी! पपा, हनीमूनसाठी निघालोय आम्ही. नि पैसे कशाला हवेत? शिवाय अजित रिकाम्या खिशाने थोडेच आले असणार?'

ती झटक्यात आत निघून जाते.

पपा पुन्हा डोळ्यांवर पेपर ओढून बसतात.

o o o

मंद मंद पुढे सरकणारी गाडी.

चढतीचा रस्ता. ती खिडकीतून केव्हाची बाहेर बघतेय.

तो शेजारी.

थोडासा दूर...तो तिच्याजवळ सरकतो.

ती दचकून एकदम मागे सरकते. डोंगरावरून कोसळणारं चंदेरी पाणी थेट डब्यातून आत झिरमिरतं. त्या पाण्याचे थेंब तिच्या केसांवर चमकताहेत. ओला ओला आरसपानी चेहरा. खूप जवळ असणारा.

त्याच्या नसांतून रक्ताची प्रचंड लाट उसळून धडपडत जाते. हात शिवशिवतात. ती त्याच्याकडे पाहते. तो एकटक बघतोय. ती पुन्हा सावरून बसते. खिडकीला लगटून.

तो उठतो नि दुसऱ्या टोकाच्या खिडकीतून बाहेर बघत बसतो. काळ्याशार करवंदांनी तुडुंब भरलेला हिरवा द्रोण घेतो. तिच्यासमोर धरतो. चार करवंदं ती मुकाट्याने उचलते नि पुन्हा खिडकीबाहेर नजर लावते. बाहेर तरणाताठा निसर्ग. काळ्याभोर कातळातून झिरपणाऱ्या चंद्रवेली.

हिरवे झुलते मनोरे. वर निळाभोर तलाव नि पहाटे-सारखी ओली हवा. अंगावरची शाल ती अंगभर घट्ट आवळून घेते. शालीचा कोमट स्पर्श जाणवतो नि मग पुन्हा डोळ्यां-समोर उभा राहतो तो. तिचा नवरा. अजित शिर्के.

कसा वागेल तो ?

दिवसा...

रात्री...

त्याच्या नितांत निकटपणाची उलटीपालटी चित्रं तिच्या

मनासमोर उभी–आडवी नाचून जातात. त्याची विलक्षण किळस येते. दू ऽ ऽ ऽ र पळून जावंसं वाटतं. विषानं माखलेली धारदार नजर ती त्याच्याकडे फेकते.

...बाहीचं बटण तोंडानं चावीत तो कुठं तरी उगाच बघतोय. तिला जाणवतं, त्याच्या मिशा खूप कोवळ्या आहेत. पीळ देऊन पिळदार केलेल्या मिशीवरून तिची नजर हळूच ओठांना पाहून घेते. लालबुंद ओठ. छोटेसेच. दुधाच्या सायीचा थर अजून ओठांवर पसरलाय.

एक कोवळी लहर अंगभर सरसरून जाते. ती भानावर येते. तिला स्वत:चाच खूप राग येतो. नि ती पुन्हा नजर खिडकीबाहेर काढते.

० ० ०

गाडी थांबलेली.

माथेरानचं झाडांनी वेढलेलं स्टेशन. हॉटेलवाल्यांची झुंबड. तो निर्विकारपणे वर आभाळाकडे पाहात उभा.

'कुठल्या हॉटेलमध्ये उतरायचं? सांगा ना!'

'अं?' तो दचकून तिच्याकडे पाहतो. 'मी काय सांगू? तुमच्या मागे येईन. यायलाच हवं' त्याच्या स्वरात अलिप्तता. तो बहुधा आतून रागावलाय. जाम वैतागलाय. तिला खुद्कन हसायला होतं.

'अंहं, तुम्ही नवरा आहात. तुम्ही निर्णय घ्यायचा. मी येईन तुमच्या मागे.'

'ठीक' म्हणत तो पुढे चालायला लागतो. मागे तीही झुलत झुलत चालत राहते.

...'गिरिविहार' मधली उंच डोंगरावरची खोली, अंधारी रात्र, आत दोन कॉटस्. एकमेकांना जोडलेल्या. वरती बॉम्बे डॉइंगच्या फुलपाखरी चादरी. शेजारी राजवर्खी सुरई... निळा-गुलाबी नक्षीचा पेला. ती वॉश घेऊन बाहेर येते. त्याने दोन्ही कॉटस् दोन भिंतीना लावलेल्या आहेत. मध्ये भलं मोठं अंतर. आरामात सिगारेट ओढीत तो वाचतोय. तिची चाहूल लागते नि तो उठून बसतो.

'सिगारेट ओढलेली चालेल ना तुम्हाला ? रूमचं दार बंद करायला हवं पण खिडकी उघडी ठेवलीय मी. हॅव ए रेस्ट. काही हेल्प लागली तर सांगा. मी जरा वाचत पडतो ...'

'मी ... मला काही सांगायचंय.' तिचे अडखळते शब्द.

'बोला ना ... भय वाटतं माझं ?' तो तिच्यावर नजर रोखीत विचारतो.

'अं ... ?' ती सैरभैर. हरवलेली. काहीतरी अवघड सांगायचंय पण शब्द हरवलेले.

'रात्र झालीय. प्रत्येक स्त्रीला पहिल्या रात्री पतीला जे द्यावं लागतं ते मी द्यायला तयार आहे. पण मी खरं सांगू ? ... हा व्यवहार फक्त दोन शरिरांचाच राहतो. ज्याच्यावर मी प्रेम करते, अशा तरुणाला तनमन द्यायला खूप आवडलं असतं मला ... ! अजून तरी माझं प्रेम तुमच्यावर बसलेलं नाही. तुम्ही खूप सरळ आहात. साधे आहात, पण अजून हवे हवेसे

वाटणारे नाही. माझी खात्री आहे. कधीतरी मला तुम्ही हवेसे वाटाल. मी खरंच प्रयत्न करीन पण तो पर्यंत तुम्हाला उपाशी ठेवण्याचं पातक मी करणार नाही I Promicse you. मी तुम्हाला को–ऑपरेशन देण्याचा नक्की प्रयत्न करीन ...'

तिला बोलताना खूप धाप लागलीय. ती सुरईतलं पाणी पेल्यात ओतते नि गटागट पिऊन टाकते नि पदराने कपाळावरचा घाम टिपून घेते. तो मिशीतल्या मिशीत हसतो. आणि बोलू लागतो,

'रोशन, तुझं माझ्यावर जेव्हा प्रेम बसेल ना तेव्हा सांग. तोवर थांबायची माझी तयारी आहे ... शरीराचे अघोरी खेळ मलाही नको आहेत ... I hate it. मी तुझ्याबरोबर आहे. निर्धास्तपणे झोप ...'

तो पुन्हा डोळ्यांसमोर पुस्तक धरतो. खूप वेळ ती जागीच. तो ही पुस्तक वाचतोय. कधीतरी झोप लागलेली.

आकाशमोगरीच्या फुलांचा घनदाट गंध श्वासातून घुसमटतो. ती जागी होते. पहाटेचा अंधुक चंदेरी प्रकाश खिडकीतून आत आला आहे. अंगावरची साडी सारखी करीत ती खिडकीत येते. बुचाची उंच उंच झाडं पांढऱ्या घोसांनी लगडली आहेत. खाली टवटवीत फुलांचा दाट गालिचा सांडलाय. त्या मादक गंधाच्या लाटा श्वासातून थेट रक्तात मिसळून जातात. ती धावत बाहेर येते नि ताजी फुलं वेचून खोलीत आणते.

समोर तो गाढ झोपलाय. मिटलेल्या पापण्यांची दाट झालर. गव्हाळ रंग, पिळदार मिशा ... तो शांत झोपलाय. अगदी शांत, नितांत शांत. ती हळूच त्याच्या कॉटवर बसते.

त्याचं भोळं रुपडं तिला खूप हवंसं वाटतं. हलक्या हांतांनी ती त्याच्या अंगावर शाल घालते नि फुलं त्याच्या नाकाशी धरीत त्याच्या डोळ्यांवर ओठ टेकते. आणि त्याच्या कानात सांगत राहते,

' अजित प्लीज ... माझं तुझ्यावर प्रेम बसलंय. चक्क प्रेम ! या फुलाच्या दाट गंधासारखं. आत्ता या क्षणी. शप्पथ ... '

* *

# मृत्यूव पथे

आभाळ कोसळून जावं, नि मग आकाशाचा रेशमी पोत मंदपणे झुलत राहावा तसं मन, निरभ्र सुस्नात.

असीम एव्हाना दूर पोचला असेल. कदाचित पोलिसांच्या गोळ्यांनी छिन्नभिन्न होऊन चिखलात पसरला असेल. सारे प्रसंग कसे स्वच्छ आठवताहेत.

मनीष परवाच कलकत्त्याला गेला आहे. पैसे आणायचेत. शिवाय बरीन्चा खून कुणी केला त्याचे धागेही शोधायला हवेत.

... आठ दिवसांपूर्वीच बरीन् आला होता. या वेळी फार बोलला. खूप थकलेला, तळापासून उखडून आलेला, असा.

" रीनादी, आज या क्षणी वाटतयं, सारं व्यर्थ आहे. कैक खून केले. रक्तानं हातमाखून घेतले. शत्रू निपटून काढला की क्षणभर वाटायचं, आपण जिंकलो ... पण क्षणभरच ! मग पुन्हा पाठलाग चुकवीत अखंड धावणं. प्रत्येक क्षण मृत्यूच्या जवळिकेचा.

" असं वणवण भटकताना मन अतृप्तच राहिलं. दिदी, गेल्या सहा वर्षांत निवान्त मनानं पोटभर भातही खाल्ला नाही मी. कुणास ठाऊक, या जन्मी तरी ... "

बोलताना तो मध्येच थांबला होता. आणि मग अचानक भरती यावी तसं बोलला होता—

" परवा कलकत्त्याला शामली दिसली होती. काही क्षण असे येतात, की तनमन पेटून निघतं. वाटतं, सारं सोडून द्यावं. पुन्हा एकदा समाजाच्या चौकटीत स्वतःला झोकून द्यावं. पण सारे रस्ते माझ्यासाठी बंद आहेत. समोर आहे फक्त एकच रस्ता— "

आणि एक दिवस बरीन् मरून पडला. अतृप्त ... असहायसा.

क्रांतीच्या कल्पनेनं, नव्या राज्याच्या कल्पनेनं तिचंही मन इतके दिवस बेभानून जायचं.

अलीकडे वाटायचं, सारं खोटं आहे.
फोल आहे. पण मनीषच्या मागे फरफटत जाण्याशिवाय दुसरा मार्ग कुठं होता ?

" इथली माणसं मेलेलीच जन्मतात रे ! त्यांची मनं रक्ताच्या रंगानी पेटतील असं वाटतं तुला ? "

" चल सारं सोडून. पाटोलला जाऊ. शेती पाहू. मला एक घर हवं आहे. आणि एक इवलंसं ... " ती एक दिवस मनीषला म्हणाली होती. पण तिचे शब्द तोडीत मनीषनं कळवळून सांगितलं होतं, " रीना, प्लीज हळू बोल. सारे विचार मनात पुरून टाक. भिंतीनं जरी हे ऐकलं तरी आपली

प्रेतं गिधाडांपुढं पडतील. आय् स्टिल् बिलीव्ह अिन् माओ... अवर चेअरमन.

' पण तुझं हे असलं मरणही मी सोसू शकणार नाही. "

बरीन् गेल्यापासून वाटतं, प्रत्येक क्षण कल्पान्ताचा आहे. तो आकंठ भोगून घ्यावा. हातात गच्च पकडून ठेवावा.

गेले तीन दिवस पाऊस कोसळतोय. पाण्याचे प्रचंड लोट झोपडीच्या खालून वाहून जाताहेत. खेड्यातली घरं तशी दूरच; पण हे त्याहूनही दूर. शाळाही लांब पडते. पण खूपच सोयीचं. रात्रीअपरात्रीं येणाऱ्यांना सुरक्षित आसरा देणारं. चारीखांबावर तोललेलं घर पाऊस माथ्यावर झेलीत, मातीत घट्ट रोवून बसलंय. गेले दोन दिवस कुठली शाळा नि कुठलं काय ! तिला आठवतं, शाळेतल्या मागांवर शाली अर्धवट विणून पडल्या आहेत. त्या भिजल्या नाहीत म्हणजे मिळवली.

शारदानं सुंदर वेलवुट्टी विणलीय शालीवर. येत्या दिवाळीला ती सत्येन्ला शाल देणार आहे. सांगताना केवढी लाजत होती. शालीचा भिजून चिखल झाला तर किती दुःखी होईल शारदा !

' हे भगवान्, सारे माग सुरक्षित राहू देत. '

ती मनोमन परमेश्वराची आळवणी करते.

दुसऱ्याच क्षणी तिला स्वतःचं हसू येतं. रीना... आणि परमेश्वराची प्रार्थना करणार ?

परमेश्वराची कल्पना प्रस्थापितांनी आपल्या सोयीसाठी आणली असं सांगणाऱ्या आपण...

जंगलखोऱ्यातून काम करणाऱ्यांना हक्काचा आसरा मिळावा म्हणून दूर आसामात येणाऱ्या आपण...

संघटनेनं आदेश दिला म्हणून केवळ सोयीसाठी मनीषशी विवाह करणाऱ्या आपण...

दिवसभर मास्टरदी बनून मुलांना शिकवायचं नि रात्री पत्रं टाईप करायची. कधी बरीन् नाहीतर ज्योतिर्मयसारख्यांना निवान्तपणे लपवून ठेवायचं, यात गुंतणाऱ्या आपण...

आणि आज, परमेश्वराची प्रार्थना करणाऱ्या आपण. तिला स्वतःचं हसू येतं. पण तरीही मनात कुठंतरी निवांत वाटतं. खूप निवांत.

० ० ०

कालची रात्र. सगळीकडे भरून राहिलेला पावसाचा आवाज. पडत्या पावसाची खर्जातली धिमी लय. वाहत्या पाण्याची ओढाळ लय. आणि एकाकी दीर्घ रात्र.

इतक्यात शिडीवर पावलं वाजली होती. तिला वाटलं, मनीष आला असणार. तिनं लगबगीनं कडी उघडली. विजेच्या झोतासारखा तो आत आला, नि झट्कन् दार लावून घेतलं. कंदिलाची वात कमी केली.

रेनकोटवर चिखलाचे ओघळ. केसांतून निथळणारं पाणी आणि डोळ्यात वादळ.

तो असीम होता.

"बस. कॉफी आणते."

"कडक कर. खूप कडक." असं म्हणत त्यानं कोट काढला नि कोपऱ्यात भिरकावला.

गादीवर तो अस्ताव्यस्त बसला होता. मागच्या उशीवर मान झोकून दिली होती. डोळे मिटलेले. त्या बंद डोळ्यांतून कुठलंतरी काहूर धुमसतंय हे तिला दिसत होतं.

असीमला जायफळ घातलेली कॉफी फार आवडते. डबीतून तिनं जायफळाचा तुकडा काढला. पदरात धरून दाताखाली दाबला, नि कॉफीत टाकला. कॉफीच्या गंधानं त्याला तरतरी आणली.

" रीनू, मला कॉफीत जायफळ आवडतं हे लक्षात आहे तुझ्या अजून ? अशी कडक कॉफी दे की खूप गाढ झोप यावी वाटतं, गाढ झोपेत कायमचं बुडून जावं. कधीही जागं न होण्यासाठी."

" छी... छी... असीम !" असं म्हणत तिनं त्याच्या ओठांवर हात ठेवला होता.

तिचा हात बाजूला काढीत त्यानं विचारलं होतं,

" रीनू, खरंच तुला असं वाटतं का की मी मरू नये ? गिधाडांनी माझं सडलेलं प्रेत विचकू नये ? देन् आय मस्ट थँक गॉड–"

तिनं हात सोडवून घेतला होता, आणि ती भात टाकायला उठली होती.

तिच्यासाठीच असीम या वाटेनं आला. त्याच्या घरासमोरच्या वस्तीत ती राहायची. दिवसभर शाळेत शिकवायची आणि रात्री कॉलेजात जायची. गव्हाळ रंग. तरतरीत, शेंड्याला किंचित उचललेलं नाक, झगमगणारे डोळे, पाठीवरून थेट खाली धावणारा पिंगट जाड शेपटा.

रेल्वेस्टेशनसमोरच्या त्या झोपडपट्टीत फक्त तीच जीवंत असायची. वस्तीतल्या बायका तिच्या भोवती असायच्या. वस्तीतल्या दादानं गोंधळ घातला तर त्याला जाब विचारण्याची ताकद फक्त हिच्यातच होती. त्या बकाल, बेसहारा वस्तीला तिच्यामुळे टवटवी असायची. पलीकडे झोपड्या. मध्ये रस्ता नि अलिकडे असीमचं टुमदार घर. त्याच्या नळाचं पाणी घेण्यासाठी पहाटे झुंबड उडायची. रोजचा कचकचाट नि भांडणं. काकीम्माँ म्हणायची, ‘ उखडून टाक नळ. रोजची विकतची कटकट.’

एक दिवस पहाटे डोळा लागला होता. जाग आली रीनाच्या चढेल आवाजानं. तो बाहेर आला नि कावून ओरडला, “ रीना, तू तर पढीलिखी आहेस ना ? वचावचा भांडणं शोभतं तुला ? ओळीनं पाणी घ्याल तर बिघडेल ?”

“ लाईनबाईन तुम्हा बाबू लोकांसाठी ! अशा लाइनी लावून बसलो तर लाइनीतच मरावं लागेल.” रीनानं झटक्यात उत्तर दिलं होतं.

येताजाता रीना कुठं दिसते का याचा वेध डोळे आपोआप घ्यायचे. तिच्या जळजळीत कटाक्षांनी लगन आणखीनच वाढायची. ती दिसली नाही तर मन हुरहुरायचं.

एक दिवस रात्री तो बाहेर आला होता तेव्हाची गोष्ट. त्याच्या घराच्या कडेच्या भिंतीला शिडी लावून एक पोरगा तिच्यावर चढला होता. एका मोठ्या पत्रकाला खळ लावून ते त्याच्या हातात देत होती.

" अरे एक पत्रक पुरायचं नाही या कोबीच्या गड्याच्या घराला. चांगली चार पाच लाव– " रीना म्हणत होती– खुसखुस हसत होती. पत्रकावर लाल रंगात लिहिलं होतं–

'आमार चेअरमन माओ.

माओ चिरायू होवो. "

बाजूला माओचं रेखांकित चित्र.

तिच्या ओढीनं तो या वाटेला आला. वाटायचं, तिच्या जवळ जाता येईल. गुप्त बैठकांना जायचा. कॅम्पस्ना हळूहळू तिचं आकर्षण फिकट बनत गेलं होतं.

विचारांचं ... नव्या क्रांतीचं ... उगवत्या राज्याच्या स्वप्नांचं आकर्षण वाढत गेलं. तो पुरा अडकला. आता रीना होती एक निष्ठावंत सहकारिणी.

आदिवासी, दलित, झोपडपट्टी अशा वस्त्यांतून मनं पेटवीत हिंडायचं. संघटनेच्या शक्तीचं दर्शन म्हणून एखाद्या क्रूर जमीन-दाराचा वा कारखान्यातल्या अधिकाऱ्याचा खून पाडायचा. पुन्हा जंगलात दडून बसायचं. पुन्हा खून. पुन्हा सीमेलगतची वणवण. कधी भूतान– तिबेट करीत शस्त्रं आणायची.

कधीतरी घरही खूप दूर राहिलं होतं. उरला होता सततचा पाठलाग. खुनी प्रत्युत्तरं आणि बंदुकीच्या फैरीचे आवाज. पोलिसांना झुकांड्या देण्यात, प्रस्थापितांची डोकी छाटण्यात मस्त कैफ असायचा. मदिरेचा फेस फसफसून खाली सांडावा तसं मन झिंगून जायचं.

दहा वर्षं कशी संपली कळलं नाही. या विचारानं पीडलेली माणसं पेटून निघतील असं वाटलं होतं. शतकानुशतकांच्या चौकटी चूर होतीलसं वाटलं होत. पण माणसांची मनं तिथंच,

आणि होती तशीच होती. अलीकडे दहशत कमी व्हायला लागली होती. सरकारात उलथापालथ झाली. रोज संघटनेतल्या कुणा ना कुणाचा खून होऊ लागला. गेल्या दोन महिन्यांत वरच्या फळीतले चारजण मारले गेले होते.

चार दिवसांपूर्वी बरीन् मारला गेला होता. प्रचंड झोताच्या आवेगात सापडावं नि पुढेपुढे लोटलं जावं तसं आयुष्य. घरापासून तुटलेलं !

नव्या बांगला देशातून शस्त्रं आणताना पाठलाग झाला. मोठ्या मुष्कीलीनं तो इथवर येऊन पोचला होता. त्या चढत्या रात्री.

" चल भात खाऊन घे – "

रीनानं त्याला तंद्रीतून जागं केलं.

मोकळे केस पाठीवर फैलावून रीना त्याला वाढत होती. याच रेशमी केसांची मऊ शाल अंगावर पांघरून झोपण्याचं सुंदर स्वप्न त्यानं फार पूर्वी रंगवलं होतं. आता त्या केसात एखादा सोनेरी केस चमकू लागला होता. तेच धारदार नाक. दाट केस चकमकते डोळे. एक प्रचंड वादळ त्याच्या तना-मनातून वाहून गेलं.

" पोटभर खा, बाबा ! कधी जेवला असशील कुणास ठाऊक ! " त्याच्या ताटात भात वाढीत रीना म्हणाली होती.

" रीना, तुझे हे फैलावलेले केस. तुझ्या नजरेतला आग्रह. वाटतंय, एखादं घर तृप्त केलं असतंस. कशाला आलीस या वाटेनं ? "

" ... मनीष तुला "

त्याला काहीतरी विचारायचं होतं. तो एकदम गप्प झाला. नि मनापासून जेवू लागला.

" बरीनूचा खून झाला. तुला कळलं ?

मनीष कलकत्याला गेलाय." तिनं सांगितलं.

" हं ... " म्हणत त्यानं हातातला घास पानात टाकला होता-

" कधीतरी तो जायचाच होता. काल तो ... उद्या मी... परवा मनीष."

पुन्हा गप्प वसत त्यानं दोन घास खाल्ले होते. आणि पुन्हा आवेगानं बोलू लागला होता.

" रीना ! पाय, मन, सारं थकलंय. एक सुंदर स्वप्न मनाशी जपलं नि नकळत्या कोवळ्या वयात जाळ्यात अडकलो. तेव्हा ध्यास होता फक्त तुझा. तुझे न्हालेले ओले केस ... भांगातून कपाळावर उतरणारी सिंदुरी रेघ. त्या केसांचा मंद ओलसर गंध माझ्या नाकात दरवळायचा. जिवाला हवी असायचीस तू. फक्त तू.

" तुला लाल पत्रक लावताना पाहिलं. तुझ्या जवळ यावं, तुझ्या मनात माझ्याविषयी जवळिक निर्माण व्हावी म्हणून या वाटनं आलो.

" आल्यावर कळलं, तू कधीच मिळणार नव्हतीस. नि परतण्याच्या वाटा विजेरी काटयांनी येताक्षणीच बंद झाल्या होत्या. न संपणारा, क्षितीजहीन "

आपल्याठी, फक्त आपल्यासाठी असीम घरदार सोडून या वाटेनं आला ह्या जाणीवेनं ती सैरभैर होऊन गेली होती. आजवर जे कधी मिळालं नव्हतं, कधी मागितलं नव्हतं असं काहीतरी विलक्षण हाती यावं आणि अनामिक तृप्तीच्या लाटांनी सारा भूतकाळ झोकाळून जावा तशी ती भारून गेली. त्या क्षणी तिला असीम हवासा वाटला, फार हवासा वाटला.

" एकच इच्छा आहे. आता मरण लवकर यावं. खूप निवान्त व्हायचंय ... एकान्त हवाय. मृत्यूच देईल तो– "

" नाही ... नाही. मी तुला असं अतृप्त मरू देणार नाही. बरीन्ला शामली हवी होती. सुंदरसं घर हवं होतं. तो तसाच मेला. अतृप्त राहिला ... मी तुला घर देऊ शकणार नाही.

... पण माझे हे रेशमी केस ... मी माझं मन. असीम ! आता उशीर नको. मृत्यूच्या वाटेवरून जाताना एका सुंदर स्वप्न सत्यात आकंठ डुंबून घ्यायचंय मला. प्लीज...असीम..."

असीमचे शब्द तोडीत ती आवेगानं म्हणाली होती. आपल्या घनदाट केसांचा पिसारा त्याच्या अंगावर उधळून तिनं स्वत:ला त्याच्या बाहूत झोकून दिलं होतं.

काल पहाटे असीम निघून गेला.

असीमचं शरीर तिला आठवत नाही. सतत आठवताहेत दोन तृप्त डोळे. मृत्यूची वाट शोधणारे.

शिडीवर चाहूल लागते. मनीष आत येतो. त्याच्याही डोळ्यांत आहे एक उध्वस्त्, भीषण भाव.

" असीमला पोलिसांनी गाठलं. त्यानं स्वत:च स्वत:च्या अंगावर पिस्तुल झाडून घेतलं. रीना, मलाही वाटतंय की उद्याचा दिवस माझ्यासाठी असेल की नाही !

" ... तुला घर हवं होतं, भुरभुरत्या जावळाचं इवलंसं बाळ हवं होतं. काहीच दिलं नाही मी. द्यावं, द्यायला हवं असं वाटलंच नाही. पतिपत्नीचं नातं जोडलं होतं केवळ सोयीसाठी. पण आज मला तू हवी आहेस. तुझा आधार हवाय. "

असं म्हणत मनीष तिला जवळ ओढतोय. पण रीनाच्या थंड शरीराला आठवत असतात, असीमचे दोन तृप्त डोळे. मरणाच्या वाटेवरून संथपणे जाणारे.

* *